

# कार्य पूर्तता

## पर्व तिसरे...

२०२०-२०२६



आठवणींच्या
सावलीतून
पुढे जातांना...

**चव्हाण सतीश भानुदासराव**
B. E. (Mech.)

**1**



**आदरणीय दादा...**

तुम्ही मला राजकारणात आणलं आणि सलग तीन वेळा मराठवाडा पदवीधर मतदारसंघाची निवडणूक लढवण्याची संधी दिली.

आज पुन्हा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीला सामोरे जाताना मनात असंख्य आठवणी दाटून येत आहेत. तुम्ही दिलेला विश्वास, दाखवलेली दिशा आणि दिलेली साथ माझ्या आयुष्यभराची शिदोरी आहे. आज तुम्ही सोबत नाहीत...पण तुमच्या आठवणी, तुमचे संस्कार आणि तुमचा आशीर्वाद कायम माझ्यासोबत आहे.

दादा... तुम्ही नाहीत, ही वस्तुस्थिती स्वीकारणं आजही मनाला जमत नाही. पण तुमच्या आठवणींच्या सावलीतच पुढची वाट चालत राहायची आहे...

**- आ. सतीश चव्हाण**

## माझी भूमिका...

**सस्नेह नमस्कार..!**

आपल्या हाती ‘कार्यपूर्तता: पर्व तिसरे’ पुस्तिका देताना मनस्वी आनंद होत आहे. गेली तीन ‘टर्म’ मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मला मराठवाड्यातील पदवीधर बंधू-भगिनींनी दिली. या प्रवासाकडे मागे वळून पाहताना आज मनात समाधानाची भावना आहे. पण त्याचवेळी एका अतिशय मोठ्या पोकळीची जाणीव देखील आहे.

माझ्या राजकीय आणि सामाजिक वाटचालीत प्रत्येक महत्त्वाच्या टप्प्यावर ज्यांचे मार्गदर्शन, आशीर्वाद आणि पाठबळ लाभले ते माझे श्रद्धेय नेते स्व. अजितदादा पवार आज आपल्यात नाहीत; खरं तर आदरणीय दादांच्या मार्गदर्शनाखाली मी मागील तीन निवडणुका लढलो आणि जिंकलो देखील. दादांच्या माध्यमातून मराठवाड्याच्या विकासासाठी भरघोस असा निधी उपलब्ध झाला आणि मतदारसंघातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले प्रश्न मार्गी लावता आले. आज निवडणुकीच्या या टप्प्यावर दादांची उणीव प्रत्येक क्षणी जाणवते. त्यांचे मार्गदर्शन नाही, त्यांचा फोन नाही, एखाद्या प्रश्नावर ‘काळजी करू नको, आपण पाहू’ असा विश्वास देणारा त्यांचा आवाज नाही. ही पोकळी कधीही भरून येणारी नाही. मात्र दादांनी दिलेली शिकवण, त्यांनी ठेवलेला विश्वास आणि त्यांनी दाखवलेली विकासाची दिशा घेऊनच पुढे जाण्याचा माझा निर्धार आहे.

प्रत्येक निवडणुकीत मी जी काही आश्वासने दिली, लोकहिताची कामे केली त्या कामाच्या ठळक नोंदी त्या-त्या वेळी 'कार्यपूर्तता' मधून आपल्यासमोर ठेवत आलो. आता मागील सहा वर्षात पदवीधरांच्या प्रश्नांसोबतच शैक्षणिक, सामाजिक, कृषी, आरोग्य, क्रीडा अशा विविध क्षेत्रांतील ज्वलंत प्रश्न शासनाच्या निदर्शनास आणून देत ते मार्गी लावण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करीत आलो. यातील काही ठळक कामांचा लेखाजोखा या पुस्तिकेच्या माध्यमातून आपल्यासमोर ठेवत आहे.

आपण केलेल्या कामाचा गवगवा करावा, हा माझा स्वभाव कधीच राहिलेला नाही. लोकप्रतिनिधी म्हणून केलेली कामे ही प्रसिध्दीची बाब नसून ती आपली जबाबदारी आहे, या भावनेने मी आजवर काम केले. मात्र निवडणूक प्रक्रियेला सामोरे जाताना गेल्या काही वर्षांतील कामाचा आढावा आपल्या समोर ठेवणे ही एक औपचारिक गरज बनते. म्हणूनच ही पुस्तिका माझ्या कामाची जाहिरात म्हणून नव्हे, तर आपण दिलेल्या संधीचा आणि आपण माझ्यावर ठेवलेल्या विश्वासाचा प्रामाणिक लेखाजोखा म्हणून आपल्या हातात देत आहे.

या संपूर्ण प्रवासाचे खरे श्रेय माझ्या पदवीधर मतदारांना आहे. आपण माझ्यावर विश्वास ठेवला, आपल्या समस्या माझ्यापर्यंत पोहोचवल्या आणि त्या प्रश्नांसाठी लढण्याचे बळ दिले. आपले सहकार्य, आशीर्वाद आणि आपल्या दृढ विश्वासाशिवाय आजवरची ही वाटचाल शक्यच झाली नसती. आदरणीय दादांनी दिलेला विश्वास, पदवीधरांनी दिलेली साथ आणि गेल्या अठरा वर्षात उभे राहिलेले कार्य यांना सोबत घेऊन आता नव्या पर्वाकडे पाहत आहे.

मराठवाडा पदवीधर मतदारसंघाची निवडणूक शुक्रवार, दि. 23 ऑक्टोबर 2026 रोजी सकाळी 8:00 ते दुपारी 4:00 या वेळेत होत आहे. तरी या निवडणूक प्रक्रियेत सहभागी होऊन, आपण मला प्रथम (1) पसंतीचे अमूल्य मतदान करावे, ही नम्र विनंती.

धन्यवाद ...

**आपला,**

सतीश चव्हाण



सच
Satish Chavan
mlcsatishchavan
satishchavan55@gmail.com

कार्यपूर्तता पर्व तिसरे...

## अंतरंग....

पृष्ठ क्र.


१. माझी भूमिका 01

२. विधिमंडळातील कामगिरी 02

३. सचित्र... 03

४. पदवीधर व शैक्षणिक... 08

५. विद्यापीठ व वरिष्ठ महाविद्यालय... 13

६. प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक... 15

७. वैद्यकीय व आरोग्य... 18

८. कृषी... 20

९. क्रीडा... 22

१०. सामाजिक व उपक्रम... 24

११. कोविड : 2019-20... 29

१२. दखल... 31

१३. प्रतिक्रिया... 33

१४. माध्यमांमधून... 34


## विधिमंडळातील कामगिरी

मागील सहा वर्षांत विधान परिषदेत तारांकित प्रश्न, लक्षवेधी, अर्धा तास चर्चा, २६० चा प्रस्ताव, विशेष उल्लेख, औचित्याचा मुद्दा अशा सर्व आयुधांचा वापर करून मी पदवीधरांचे व मराठवाड्याचे प्रश्न विधिमंडळात सातत्याने मांडले. मागील सहा वर्षांमधील विधिमंडळातील माझ्या कामगिरीचा दस्ताऐवज आपणांस सादर करीत आहे.

| अ. क्र. | | एकूण |
|---|---|---|
| १ | तारांकित प्रश्न | ६७७ |
| २ | लक्षवेधी | ९७ |
| ३ | अर्धा तास चर्चा | ५५ |
| ४ | २६० चा प्रस्ताव | २२ |
| ५ | विशेष उल्लेख | १०७ |
| ६ | औचित्याचा मुद्दा | २० |




देशाच्या महामहीम राष्ट्रपती आदरणीय द्रौपदीजी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे दिला जाणारा वर्ष 2019-20 साठीचा महाराष्ट्र विधान परिषद 'उत्कृष्ट संसदपटू' पुरस्कार देऊन मला सन्मानित करण्यात आले.

मागील दोन दशके मी मराठवाड्यातील पदवीधरांबरोबरच शेतकरी, कष्टकरी, कामगार, विद्यार्थी अशा विविध घटकांतील सर्वसामान्य माणसांना न्याय देण्यासाठी विधिमंडळात आवाज उठवत आलो. मराठवाड्यातील अनेक प्रश्न विविध संसदीय 'आयुधे' वापरून प्रत्येक अधिवेशनात मांडून त्यांना विधिमंडळाच्या पटलावर आणून न्याय देण्याचा प्रयत्न मी केला.

राज्याचे विधिमंडळ हे जनतेच्या आशा-आकांक्षा पूर्ण करण्याचे सर्वोच्च स्थान आहे. अशा सार्वभौम सभागृहात आपण मला सातत्यपूर्ण कार्य करण्याची संधी दिली म्हणून मी जनतेचा 'आवाज' होण्याचा प्रयत्न केला. आज त्याचा हा सन्मान आहे. हा पुरस्कार माझाच नव्हे; तर माझ्या मराठवाड्यातील जनतेचा सन्मान होता, असे मी नेहमीच मानतो.



कायगाव (जि. छत्रपती संभाजीनगर) येथील पवित्र गोदावरी नदीत राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अस्थि विधिपूर्वक विसर्जित करतांना.



राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांच्या 67 व्या जयंतीनिमित्त 21 जुले 2026 रोजी मुंबई येथे आयोजित 'अजित स्मृती अवीट स्मृती' छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.देवेंद्रजी फडणवीस साहेब व उपमुख्यमंत्री मा.ना.सुनेत्रावहिनी पवार यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी उपस्थित होतो.



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्यावतीने 19 सप्टेंबर 2025 मध्ये नागपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रवादी चिंतन शिबिरात 'राष्ट्रवादी काँग्रेसचे तत्कालीन अध्यक्ष तथा राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री मा.ना.अजितदादा पवार यांच्या सोबत चर्चा करताना. सोबत प्रदेशाध्यक्ष खा.सुनीलजी तटकरे साहेब, मा.ना.सुनेत्रावहिनी पवार.




अंतरवाली सराटी (जि. जालना) येथे श्री.मनोज जरांगे पाटील यांचे सप्टेंबर 2026 मध्ये उपोषण सुरू होते. या उपोषणस्थळी भेट देऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. यावेळी मराठा आरक्षण संदर्भातील विविध पैलूंवर सविस्तर चर्चा केली.



मराठवाड्याच्या विविध विषयांवर राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री मा.ना.अजितदादा पवार यांच्याशी छत्रपती संभाजीनगर येथील सुभेदारी शासकीय विश्रामगृह येथे चर्चा करतांना.



मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचा लोकप्रतिनिधी या नात्याने मागील 18 वर्षांपासून विधिमंडळात, विधिमंडळाच्या बाहेर केलेल्या सामाजिक कार्याची दखल घेत दै. लोकमतने मला 'महाराष्ट्र रत्न' पुरस्कार देऊन सन्मानित केले. लंडनमध्ये आयोजित करण्यात आलेला हा पुरस्कार आमच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष मा.खा.सुनीलजी तटकरे साहेबांच्या हस्ते स्वीकारता आला याचा मनस्वी आनंद आहे.



विधान परिषदेच्या उपसभापतीच्या निवडणुकीसाठी महायुतीच्यावतीने शिवसेनेचे आ.सचिनजी अहिर यांनी 30 जून 2026 रोजी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. याप्रसंगी उपस्थित होतो. यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री मा.ना.एकनाथजी शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री मा.ना.सुनेत्रावहिनी पवार यांच्यासह विधिमंडळातील सहकारी उपस्थित होते.



मराठा समाजातील विद्यार्थ्यांना इतर मागास वर्ग प्रवर्गातील (ओबीसी) विद्यार्थ्यांप्रमाणे सर्व शैक्षणिक सवलती व सोयी-सुविधांचा लाभ देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. या घेतलेल्या ऐतिहासिक निर्णयाबद्दल मुख्यमंत्री मा.ना.देवेंद्रजी फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री मा.ना.सुनेत्रावहिनी पवार यांची मंत्रालयात भेट घेऊन आभार मानले.



राज्यस्थानचे महामहीम राज्यपाल मा.ना. हरिभाऊजी बागडे (नाना) यांच्या छत्रपती संभाजीनगर येथील निवासस्थानी भेट देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा देतांना.



"निर्धार नवपर्वाचा कार्यकर्ता संवाद मेळावा" प्रसंगी प्रदेशाध्यक्ष खा.सुनीलजी तटकरे साहेब यांच्या सोबत चर्चा करतांना.

छत्रपती संभाजीनगर शहरातील शासकीय कर्करोग रुग्णालयातील कर्करोगावरील अतिविशेष उपचार देणारी अत्याधुनिक यंत्र प्रणाली व कर्करोग संस्थेच्या विस्तारीत भागाचे लोकार्पण एप्रिल 2025 रोजी मा.ना.जे.पी.नड्डा साहेब, मा.ना.देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित होतो.






माझ्या विशेष प्रयत्नातून गंगापूर (जि.छत्रपती संभाजीनगर) शहरात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात आला. सदरील पुतळ्याचे अनावरण राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री मा.ना.अजितदादा पवार यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी श्री.भूषणसिंहराजे होळकर यांची देखील प्रमुख उपस्थिती होती.



ह.भ.प.गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या सोबत चर्चा करताना.



खुलताबाद तालुक्यातील प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधांवर जाऊन नुकसान झालेल्या पिकांची पाहणी केली.



राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री मा.ना.अजितदादा पवार यांनी 4 मे 2025 रोजी छत्रपती संभाजीनगर येथील उद्योजकांशी संवाद साधून त्यांच्या अडी-अडचणी समजून घेतल्या. याप्रसंगी उपस्थित होतो.



छत्रपती संभाजीनगर येथील नामवंत विधिज्ञ ॲड.सिद्धेश्वरजी ठोंबरे यांची मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती पदावर निवड झाली. याबद्दल शुभेच्छा देतांना.

➪ राज्यातील विविध महाविद्यालयांमध्ये सहाय्यक प्राध्यापक पदासाठी आवश्यक असलेली राज्य पात्रता परीक्षा (SET) ही अत्यंत महत्त्वाची परीक्षा दरवर्षी साधारणपणे जून महिन्यात घेतल्या जाते. मात्र सन 2026 मध्ये होणाऱ्या या परीक्षेची अद्यापही कुठलीही घोषणा करण्यात आली नसल्याचे राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री मा.ना.चंद्रकांतदादा पाटील यांच्या निदर्शनास आणून देत राज्य पात्रता परीक्षा (SET) लवकर आयोजित करून त्याबाबतची अधिकृत अधिसूचना जाहीर करावी अशी आग्रही मागणी केली होती. लवकरच अधिकृत अधिसूचना जाहीर केली जाईल असे मा.ना.चंद्रकांतदादा पाटील यांनी मला आश्वास्त केले. अखेर सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्यावतीने अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली असून राज्य पात्रता परीक्षा (SET) 25 ऑक्टोबर 2026 रोजी होणार आहे.

➪ मराठवाड्यात सध्या निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व परीक्षा शुल्क माफ करावे अशी मागणी मी 19 सप्टेंबर 2026 रोजी राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.देवेंद्र फडणवीस साहेब यांच्याकडे केली. मराठवाड्यात सध्या निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी, शेतमजूर तसेच सर्वसमान्य कुटुंबावर मोठे आर्थिक संकट निर्माण झाले आहे. या परिस्थितीचा सर्वाधिक परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होण्याची शक्यता आहे. अनेक पालकांना विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व इतर शैक्षणिक खर्च भागवणे अडचणीचे झाले आहे. दुष्काळामुळे आर्थिक अडचणीत असलेल्या कुटुंबातील विद्यार्थ्यांचे शिक्षण खंडित होऊ नये आणि कोणताही विद्यार्थी केवळ आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये, तसेच मराठवाड्यातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याचा विचार करून शासनाने शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क माफ करण्यासंदर्भात त्वरित कार्यवाही करावी अशी मागणी मुख्यमंत्री महोदयांकडे केली. अखेर माझ्या मागणीला यश आले असून शासनाने 25 सप्टेंबर 2026 रोजी शासन निर्णय निर्गमित करून विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय घेतला.

➪ छत्रपती संभाजीनगर येथे 'सारथी' संस्थेचे वसतिगृह सुरू करण्यासंदर्भात 13 सप्टेंबर 2023 रोजी राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री मा.ना.अजितदादा पवार यांची मुंबई येथील देवगिरी निवासस्थानी भेट घेतली. राज्य शासनाच्या महसूल विभागाकडून छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या संस्थेच्यावतीने छत्रपती संभाजीनगर येथे विभागीय मुख्यालय सुरू करण्यासाठी तसेच छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व लक्षीत गटातील लाभार्थ्यांसाठी अभ्यासिका, मुला-मुलींना वेगवेगळे वसतिगृह इत्यादी प्रयोजनासाठी गारखेडा परिसरातील (छत्रपती संभाजीनगर) सी.टी.एस.क्र.15309 मधील 1.24 हे. आर जमीन नियोजन विभागास प्रदान करण्यास तसेच सदर प्रकल्पाच्या बांधकाम व संचालनाचे काम सारथी संस्थेमार्फत करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली होती. मात्र सदरील प्रशासकीय मान्यता मिळवून वर्ष होऊनही अद्यापही यासंदर्भात काहीच कार्यवाही झाली नसल्याचे आदरणीय दादांच्या निदर्शनास आणून दिले. आदरणीय दादांनी माझ्या मागणीची तात्काळ दखल घेत यासंदर्भात त्वरित योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. अखेर काही दिवसातच सदरील ठिकाणी काम सुरू झाले. आदरणीय दादांनी 4 मे 2025 रोजी या कामाची पाहणी करून आढावा घेतला. लवकरच हे काम पूर्ण होणार आहे.

➪ यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ अंतर्गत घेण्यात येणाऱ्या बी.एड. परीक्षांमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांना त्यांच्या जिल्ह्याच्या ठिकाणी परीक्षा केंद्र द्यावे अशी विनंती मी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या कुलगुरू महोदयांकडे केली होती. माझ्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत या संदर्भात विद्यापीठ स्तरावर आवश्यक ते नियोजन करण्यात येणार असल्याचे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.सुरेंद्र पाटोळे यांनी 2 सप्टेंबर 2026 रोजी मला पत्राद्वारे कळविले.

➪ गंगापूर (जि.छत्रपती संभाजीनगर) शहरातील श्री मुक्तानंद महाविद्यालयात मी 23 सप्टेंबर 2024 रोजी नोकरी महोत्सव आयोजित केला होता. या महोत्सवात सुशिक्षीत बेराजगार तरुण तरुणींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. 4500 हून अधिक तरुणांनी या नोकरी महोत्सवात सहभाग नोंदविला. त्यापैकी 1398 युवकांना विविध नामांकित कंपन्यांमध्ये चांगल्या पगाराची नोकरी मिळाली. यामध्ये मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, अहमदनगर येथील टाटा सर्व्हिसेस, महिंद्रा ॲन्ड महिंद्रा, लक्ष्मी हायड्रॉलिक, एसबीआय बँक, एक्सीस बँक, आयसीआयसीआय बँक, युरेका यासह 65 हून अधिक नामांकित कंपन्या सहभागी झाल्या होत्या. विद्यार्थ्यांची शैक्षणिक पात्रता, गुणवत्ता व मुलाखतीच्या आधारे विद्यार्थ्यांना विविध कंपन्यामध्ये वार्षिक 3 ते 4 लाख रुपये पॅकेजच्या पगारांच्या नोकरी देण्यात आली. तर दुसऱ्या फेरीसाठी 1470 विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. जॉब फेअर इंडियाच्या संचालिका श्रीमती तस्मिया शेख यांचे या नोकरी महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी मोठे सहकार्य लाभले...

➪ मराठवाड्यातील पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या अडीअडचणी संदर्भात 4 एप्रिल 2022 रोजी तत्कालीन विभागीय आयुक्त श्री.सुनील केंद्रेकर यांची भेट घेतली. पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या राज्यशासनाच्या अधिपत्याखालील कार्यालयीन आस्थापनेच्या रिक्त जागांवर कंत्राटी तत्वावर प्राधान्याने नियुक्ती देण्यात यावी अशी मागणी मी वेळोवेळी शासनाकडे करत आलो आहे. शासनाच्या महसूल विभागाने 8 मार्च 2022 रोजी सर्व विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकाऱ्यांना पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या शासनाच्या कार्यालयीन आस्थापनेच्या रिक्त जागांवर प्राधान्याने नेमणुका देण्याची कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या होत्या मात्र अद्यापही यासंदर्भात जिल्हापातळीवर काहीच कार्यवाही होत नसल्याचे श्री.सुनील केंद्रेकर यांच्या निदर्शनास आणून दिले.

➪ शासकीय नोकरीचे स्वप्न उराशी बाळगून असलेले लाखो तरुण-तरुणी राज्य सरकारच्या विविध विभागांमधील भरतीची तयारी करतात. याची जाणीव असतानाही राज्य शासनाने सन 2023 मध्ये स्पर्धा परीक्षा शुल्कात भरमसाठ वाढ केली होती. मात्र सदरील स्पर्धा परीक्षा शुल्कात कपात करावी अशी मागणी मी 26 जुलै 2023 रोजी विधान परिषदेत विशेष उल्लेखाद्वारे केली. मागील 10 वर्षांपासून राज्यातील सुशिक्षीत बेरोजगारांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. शासनाकडून काही तरी अपेक्षा ठेवून गोरगरीब विद्यार्थी शहरात राहून स्पर्धा परीक्षेची तयारी करतात. शिकवणी वर्ग, रहायची व्यवस्था, भोजन आदींचा खर्च आधीच या विद्यार्थ्यांना झेपणारा नाही. त्यात राज्य शासनाच्या विविध विभागांमधील भरतीसाठी स्पर्धा परीक्षा शुल्क 300 रु. वरुन 1000 रु. करण्यात आले आहे. त्यामुळे राज्यातील विद्यार्थी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. असंख्य विद्यार्थी पैशाअभावी अर्ज भरू शकत नसल्याने विविध परीक्षा देण्यापासून वंचित राहत आहेत. त्यामुळे राज्यभरातील विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता तसेच त्यांना एकापेक्षा अधिक स्पर्धा परीक्षा देता याव्यात यासाठी राज्य शासनाने स्पर्धा परीक्षा शुल्कात केलेली वाढ कमी करुन 100 ते 150 रु. पर्यंत परीक्षा शुल्क आकारावे अशी आग्रही मागणी मी विशेष उल्लेखाद्वारे सभागृहात केली...

➪ वैद्यकीय अभ्यासक्रमांसाठी आवश्यक असणारी 'नीट' व राज्य शासनाच्या राज्य समाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या (सीईटी सेल) माध्यमातून घेण्यात येणारी सीईटी-पीसीएम या परीक्षा 5 मे 2024 रोजी होणार होत्या. दोन्ही परीक्षा एकाच दिवशी आल्याने सीईटी परीक्षेच्या तारखेत बदल करावा अशी मागणी 24 मार्च 2024 रोजी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री मा.ना.चंद्रकांतदादा पाटील, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाचे आयुक्त यांच्याकडे केली होती. माझ्या मागणीची दखल घेत सीईटी परीक्षेच्या वेळापत्रकात अंशतः बदल करण्यात आला आणि 5 मे रोजी होणारी परीक्षा पुढे ढकलली. यामुळे पात्रता धारक विद्यार्थ्यांना दोन्ही परीक्षा देता आल्या.

➪ महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने 28 जून 2026 रोजी राज्यात शिक्षक पात्रता परीक्षा (TET)2026 आयोजित करण्यात आली होती. या परीक्षेचा देखील पेपर एक दिवस आधी फुटल्याने 28 जून 2026 रोजी होणारी TET परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने घेतला. या पेपरफुटी प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करावी अशी मागणी 27 जून 2026 रोजी राज्याचे मुख्यमंत्री मा. ना. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली. NEET परीक्षेनंतर आता शिक्षक पात्रता परीक्षा देखील पेपरफुटीच्या विळख्यात सापडली आहे. हा केवळ एक पेपर पुढे ढकलण्याचा विषय नाही तर लाखो परीक्षार्थींच्या मेहनतीचा, त्यांच्या भविष्याचा प्रश्न आहे. यामुळे महिनोनमहिने अभ्यास करून, नोकरीची स्वप्ने डोळ्यांत साठवून बसलेल्या परीक्षार्थींना मानसिक, आर्थिक आणि शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे. ही अत्यंत संतापजनक बाब असल्याचे मुख्यमंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिले.

➪ शैक्षणिक वर्ष 2021-22 साठी अभियांत्रिकी शाखेच्या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रकिया 16 डिसेंबर 2021 पर्यंत चालणार होती.मात्र ज्या विद्यार्थ्यांना सदरील अभ्यासक्रमांसाठी प्रवेश मिळणार नाही असे असंख्य विद्यार्थी पदवी विज्ञान व इतर शाखेसाठी प्रवेश घेतात. मात्र शैक्षणिक वर्ष 2021-22 साठी नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्यावतीने संलग्नित महाविद्यालयात पदवी व प?व्युत्तर प्रवेशासाठी 30 नोव्हेंबर 2021 ही अंतिम तारिख दिली होती. सदरील तारीख संपल्याने अभियांत्रिकी शाखेसाठी प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना पदवी विज्ञान व इतर शाखेच्या पदवी अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेता येणार नव्हता. त्यामुळे असंख्य विद्यार्थी पुढील शिक्षणापासून वंचित राहणार होते. करिता विद्यापीठांना पदवी व प?व्युत्तर प्रवेशासाठी मुदत वाढ देण्यात यावी अशी मागणी 5 डिसेंबर 2021 रोजी राज्याचे तत्कालीन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री मा.ना.उदयजी सामंत यांच्याकडे केली आहे.

➪ शासकीय वसतिगृहात राहणाऱ्या इयत्ता 11 वी व 12 वी च्या विद्यार्थ्यांना वार्षिक परीक्षा संपल्यानंतर शासकीय वसतिगृहात राहता येत नव्हते. मात्र वार्षिक परीक्षा संपल्यावर अनेक महाविद्यालयांमध्ये उन्हाळी वर्ग (Summer Classes) घेण्यात येतात. तसेच अनेक विद्यार्थी JEE/NEET/CET या परीक्षांची तयारी करतात. यातील बहुतांश विद्यार्थी हे ग्रामीण भागातील असल्याने आर्थिक परिस्थिती अभावी ते शहरात स्वतंत्र रूम करून राहू शकत नाहीत. त्यामुळे या विद्यार्थ्यांना उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत शासकीय वसतिगृहात राहण्याची परवानगी देण्यात यावी अशी मागणी मी राज्याचे सामाजिक न्याय मंत्री मा.ना.संजयजी शिरसाट यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती. अखेर माझ्या या प्रयत्नाला यश आले. सामाजिक न्याय विभागाने 25 मार्च 2026 रोजी परिपत्रक काढून राज्यातील सामाजिक न्याय विभागांतर्गत शासकीय वसतिगृहात राहणाऱ्या इयत्ता 11 वी व 12 वी च्या वर्गांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत देखील शासकीय वसतिगृहामध्ये निवासाची सुविधा सुरू ठेवण्याच्या सूचना संबंधित विभागांना दिल्या. विद्यार्थी हिताचा निर्णय घेतल्याबद्दल महायुती सरकारचे मनःपूर्वक आभार मानले.

➪ राज्यातील कृषी विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर पदे भरण्यासंदर्भात 15 एप्रिल 2026 रोजी मंत्रालयात कृषी मंत्री मा.ना.दत्तात्रयजी भरणे यांची भेट घेतली. राज्यात चार कृषी विद्यापीठे कार्यरत असून 11400 पदांचा सुधारित आकृतीबंध मान्यतेसाठी प्रलंबित आहे. आकृतीबंध मंजूर होण्यास विलंब होत असल्याने तांत्रिक, अतांत्रिक पदाची भरती प्रक्रिया रखडली असल्याचे मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिले. या संदर्भात मी शासनस्तरावर वेळोवेळी पाठपुरावा करीत आहे. कृषी विद्यापीठाचा आकृतीबंध तात्काळ अंतिम करून राज्यसेवा आयोगाकडे भरतीसाठी मागणीपत्र देण्यासंदर्भात त्वरित योग्य ती कार्यवाही करावी अशी विनंती कृषी मंत्र्यांकडे केली... यासंदर्भातील कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

➩ शिक्षण व्यवस्थेचा कणा मानली जाणारी समग्र शिक्षा योजना बंद पडली असून राज्यातील सुमारे 3 हजार 800 कर्मचारी बेरोजगार झाले आहेत. त्यामुळे समग्र शिक्षा योजना परत सुरू करावी अशी मागणी मी 7 जुलै 2026 रोजी विशेष उल्लेखाव्दारे विधान परिषदेत केली. समग्र शिक्षा योजनेतील कर्मचाऱ्यांना सहा महिन्यांची तात्पूर्ती नियुक्ती देऊन मध्येच एक महिन्याचा सेवाखंड देत पुन्हा पुनर्नियुक्ती दिली जात असे. मार्च 2026 रोजी नियुक्ती संपल्यानंतर एप्रिल पासून पुनर्नियुक्ती देणे अपेक्षित असतांना केंद्र शासनाने ही योजना थांबविल्यामुळे राज्यातील 3 हजार 800 कर्मचारी बरोजगार झाले असल्याचे विशेष उल्लेखाव्दारे सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. समग्र शिक्षा योजनेअंतर्गत शाळा गुणवत्ता मूल्यांकन याच बरोबर मोफत पाठ्यपुस्तके व गणवेश वितरण, शाळाबाह्य विद्यार्थ्यांचा शोध, पट वाढवा अभियान असे महत्त्वाचे उपक्रम राबविले जात असे. या योजनेअंतर्गत काम करणारे वरिष्ठ अभियंते, कार्यक्रम अधिकारी, संगणक प्रोग्रामर, समन्वयक, संशोधन सहाय्यक, विषयतज्ञ इत्यादी कुशल मनुष्यबळ कार्यरत होते. मात्र सदरील योजना बंद पडल्याने यामध्ये काम करणाऱ्या हजारो कर्मचाऱ्यांवर अचानक बेरोजगाराची कुऱ्हाड कोसळल्याने संतापाची लाट उसळली आहे. त्यामुळे ही योजना परत कार्यान्वित करण्यासाठी शासनाने त्वरित आवश्यक ती कार्यवाही करावी अशी आग्रही मागणी विशेष उल्लेखाव्दारे केली...

➩ महात्मा ज्योतिबा फुले संशोधन छात्रवृत्तीसाठी Ph.D.-2022 करिता 1 मे 2022 ते 30 जून 2022 या कालावधीत अर्ज मागवण्यात आले होते. त्यानुसार उमेदवारांच्या मूळ प्रमाणपत्रांची/कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी 1 ते 15 सप्टेंबर दरम्यान नागपूर येथील महाज्योती कार्यालयात अर्जदार विद्यार्थ्यांना बोलावण्यात आले. मात्र, मराठवाड्यातील उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी छत्रपती संभाजीनगर येथील महाज्योतीच्या विभागीय कार्यालयात करावी, अशी मागणी 30 ऑगस्ट 2022 रोजी तत्कालीन इतर मागास व बहुजन कल्याण मंत्री मा. ना. अतुलजी सावे यांच्याकडे केली.

➩ सन 2024-25 या शैक्षणिक वर्षासाठी अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांमधील शैक्षणिक संस्थांमधील SEBC प्रवर्गातून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास अडचणी येत असून सदरील जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास सहा महिन्यांचा कालावधी देण्यात यावा अशी मागणी मी जुलै 2024 रोजी राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री मा.ना.एकनाथरावजी शिंदे साहेब, तत्कालीन उपमुख्यमंत्री मा.ना.अजितदादा पवार यांच्याकडे केली होती. माझ्या मागणीची दखल घेत शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने 22 जुलै 2024 रोजी शासन निर्णय निर्गमीत केला. राज्यात सुरू असलेल्या सन 2024-25 मधील विविध शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी (अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसहित) उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात येत असलेल्या अडचणी लक्षात घेऊन सदर शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी (अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसहित) उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी, प्रवेशासाठी अर्ज केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांचा कालावधी देण्यात येत असल्याचे सदरील शासन निर्णयात नमूद करण्यात आले.



राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री मा.ना.अजितदादा पवार यांनी छत्रपती संभाजीनगर येथे 'सारथी' संस्थेच्या वसतिगृह कामाची पाहणी करून आढावा घेतला. याप्रसंगी उपस्थित होतो.



राज्य पात्रता परीक्षा (SET) लवकर आयोजित करावी अशी मागणी मा.ना.चंद्रकांतदादा पाटील यांच्याकडे करतांना.




गंगापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या नोकरी महोत्सवात सुशिक्षीत बेराजगार तरुण तरुणींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. नोकरी महोत्सवात निवड झालेल्या युवकांसोबत.

राज्यातील सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांच्या प्रलंबित मागण्यांसंदर्भात 23 फेब्रुवारी 2021 रोजी मंत्रालयात राज्याचे तत्कालीन ग्रामविकास मंत्री मा.ना.हसनजी मुश्रीफ साहेब यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस उपस्थित राहून सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांचे विविध प्रश्न मंत्री महोदयांच्या निर्दशनास आणून दिले.



➩ राज्यातील अकृषी विद्यापीठे व अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील 23 ऑक्टोबर 1992 ते 3 एप्रिल 2000 या कालावधीत नियुक्त असलेल्या बिगर नेट-सेट अध्यापकांना निवृत्तीवेतनाचा लाभ देण्याचा निर्णय तत्कालीन सरकारने सन 2021 मध्ये घेतला होता. याबद्दल राज्याचे तत्कालीन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री मा.ना.उदयजी सामंत यांचा 12 नोव्हेंबर 2021 रोजी छत्रपती संभाजीनगर येथे सत्कार करण्यात आला. यासंदर्भात मी शासनस्तराव वेळोवेळी पाठपुरावा करत होतो. विधान परिषदेत लक्षवेधी, तारांकित प्रश्न उपस्थित करून अनेक वेळा सभागृहाचे लक्ष वेधले. तसेच राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री मा.ना. अजितदादा पवार, तत्कालीन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री मा.ना.उदयजी सामंत यांच्यासोबत याविषयावर वेळावेळी बैठका देखील झाल्या होत्या. अखेर माझ्या या पाठपुराव्याला यश आले.

➩ 24 नोव्हेंबर 2001 पूर्वी मान्यता मिळालेल्या राज्यातील महाविद्यालयांच्या अनुदानासंदर्भात 9 जानेवारी 2024 रोजी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री मा.ना.चंद्रकांतदादा पाटील यांच्या अध्यक्षेतेखाली मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस उपस्थित होतो. 24 नोव्हेंबर 2001 पूर्वी मान्यता मिळालेली राज्यातील जवळपास 78 महाविद्यालय आहेत. या महाविद्यालयांना अनुदान पात्र करण्यासाठी 3 वेळेस तपासण्या देखील झाल्या. मात्र अद्यापही सदरील महाविद्यालयांना अनुदान पात्र घोषित करण्यात आलेले नाही. संस्थाचालक मागील 22 वर्षांपासून ही महाविद्यालय चालवत असून महाविद्यालयात कार्यरत असलेल्या शिक्षकांनाही आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. सदरील महाविद्यालयांना तत्काळ अनुदान पात्र घोषित करून अनुदान पात्र करतांना 2023 च्या वर्क लोड नुसार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे मान्य करावीत अशी आग्रही मागणी मा.ना.चंद्रकांतदादा पाटील यांच्याकडे केली. मंत्री महोदयांनी सदरील महाविद्यालयांचे संचालक स्तरावर आलेले प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. यासंदर्भात शासनस्तरावर पाठपुरावा सुरू आहे.

➩ राज्यातील अकृषी विद्यापीठे, अशासकीय महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना लागू करण्यासंदर्भात 11 एप्रिल 2022 रोजी राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री मा.ना.अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस उपस्थित होतो. राज्यातील अकृषी विद्यापीठे व सलग्नित महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मिळणारे आश्वासित प्रगती योजनेचे लाभ शासन निर्णय 7.12.2018 अन्वये पूर्वलक्षी प्रभावाने रद्द केल्याने सदर कर्मचाऱ्यांना वसुलीची भीती होती. मात्र त्या वसुलीस सदरील बैठकीत स्थगिती देण्यात आली.

➩ डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने कायम संलग्निकरण असणाऱ्या महाविद्यालयांकडून संलग्निकरणाचे पाच पट शुल्क वसुली रद्द करून वार्षिक 10 % शुल्क वाढ करण्याचा निर्णय विद्या परिषदेच्या बैठकीत घेतला. विद्यापीठाशी संलग्न जवळपास 116 महाविद्यालयांच्या हिताचा हा निर्णय झाला आहे. पाच पट शुल्क वसुली संदर्भात विद्यापीठाचे कुलगुरू, प्र कुलगुरू यांची भेट घेऊन पाच पट शुल्क वसुली रद्द करण्याची मागणी केली होती. अखेर माझ्या या मागणीला यश आले.

➩ दि.01.01.1994 ते दि.19.07.2009 या कालावधीत एम.फिल.ही शैक्षणिक अर्हता प्राप्त केलेल्या प्राध्यापकांना कॅस (CAS) चे लाभ पूर्ववत चालू ठेवावे अशी मागणी मी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री मा.ना.चंद्रकांतदादा पाटील यांच्याकडे नागपूर येथे डिसेंबर 2022 मध्ये झालेल्या हिवाळी अधिवेशना दरम्यान केली होती. यासंदर्भात राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे उप सचिव श्री.अजित बाविस्कर यांनी 16 फेब्रुवारी 2023 रोजी पत्राद्वारे 1) ज्या अध्यापकांनी नियुक्तीपूर्वी एम.फिल. अर्हता धारण केली असेल त्यांना नियुक्तीपासून व 2) ज्यांनी सेवेत असताना एम.फिल. अर्हता धारण केली असेल त्यांना सदर धारण केल्याच्या दिनांकापासून कॅस अंतर्गत पदोन्नतीचे लाभ देय राहतील असे नमूद केले. शासनस्तरावर मी सदरील प्रश्नासंदर्भात वेळोवेळी पाठपुरावा करत होतो. अखेर अध्यापकांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न मार्गी लागला.



उच्च शिक्षण विभागातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांसंदर्भात 7 जून 2022 रोजी राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री मा.ना.अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस उपस्थित होतो.



बिगर नेट-सेट अध्यापकांना निवृत्तीवेतनाचा लाभ देण्याचा निर्णय घेतल्या बद्दल राज्याचे तत्कालीन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री मा.ना.उदयजी सामंत यांचा सत्कार करतांना.




डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अधिसभा व विद्यापरिषद निवडणुकीतील उत्कर्ष पॅनलच्या यशा बद्दल ना. श्री. अजितदादा पवार यांच्या हस्ते सत्कार स्वीकारतांना. याप्रसंगी मा. श्री. दिलीपरावजी वळसे पाटील उपस्थित होते.




सहविचार सभेत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर चर्चा करतांना.



24 नोव्हेंबर 2001 पूर्वी मान्यता मिळालेल्या महाविद्यालयांच्या अनुदानासंदर्भात मा.ना.चंद्रकांतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस उपस्थित होतो.

➩ राज्यातील अनुदानासाठी घोषित केलेल्या खाजगी प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा/तुकड्यांना 20 टक्के तसेच यापूर्वी 20 टक्के अनुदान उपलब्ध करून दिलेल्या शाळांना पुढील 20 टक्के वाढीव टप्पा अनुदान देण्याचा निर्णय तत्कालीन सरकारने यापूर्वीच घेतला होता. 1 मार्च 2021 पासून सुरु झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात पुरवणी मागण्यामध्ये यासंदर्भात निधीची तरतूद करण्यात आली होती. शिक्षकांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न मार्गी लावल्याबद्दल पदवीधर व शिक्षक आमदारांनी 1 मार्च 2021 रोजी तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा अर्थ मंत्री मा.ना.अजितदादा पवार यांची सदिच्छा भेट घेऊन आभार मानले.

➩ संच मान्यता व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरतीबाबत 5 ऑगस्ट 2025 रोजी मुंबई येथे राज्याचे तत्कालीन शालेय शिक्षण मंत्री मा.ना.दादाजी भुसे यांच्या दालनात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस उपस्थित होतो. संच मान्यतेचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने हे प्रकरण निकाली निघाल्यावर संच मान्यतेचा विषय मार्गी लावला जाईल. तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरतीबाबत शासन सकारात्मक असून या संदर्भात देखील लवकरच योग्य तो निर्णय घेण्यात येईल असे मंत्री महोदयांनी या बैठकीत आश्वासित केले होते . याप्रसंगी विधिमंडळातील माझे सहकारी आ.विक्रमजी काळे यांच्यासह पदवीधर, शिक्षक आमदार महोदय, शालेय शिक्षण विभागाचे संबंधित अधिकारी देखील उपस्थित होते.. आमच्या मागणी नुसार शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरतीबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु करण्यात आली आहे

➩ गंगापूर तालुक्यातील ढोरेगाव येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेची संपूर्ण इमारत मोडकळीस आलेली असून सदरील शाळेच्या नवीन इमारत बांधकामासह आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून द्याव्यात यासाठी मी शासनस्तरावर वेळावेळी पाठपुरावा करीत होतो. अखेर माझ्या मागणीला यश आले. समग्र शिक्षा वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रक सन 2023-24 मध्ये या शाळेत नवीन 6 वर्ग खोल्या बांधकामासाठी 81 लक्ष रुपयाचा निधी मंजूर करण्यात आला. 16 सप्टेंबर 2022 रोजी मी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे राज्य प्रकल्प संचालकांना ढोरेगाव येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेची इमारत जीर्ण होऊन मोडकळीस आली असून सदरील वर्गखोल्यांमध्ये विद्यार्थ्यांना बसविणे जोखमीचे व धोकादायक असल्याचे पत्राव्दारे निदर्शनास आणून देत सदरील शाळेच्या इमारत बांधकाम व इतर सोयीसुविधांकरिता त्वरित आवश्यक तो निधी उपलब्ध करून द्यावा अशी आग्रही मागणी केली होती. 7 मार्च 2022 रोजी अर्थसंकल्पीय अधिवेशनात देखील मी यासंदर्भात सभागृहात प्रश्न उपस्थित करून सभागृहाचे लक्ष वेधले. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे राज्य प्रकल्प समन्वयक समीर सावंत यांनी 5 जुलै 2023 रोजी परिपत्रक काढून समग्र शिक्षा या योजनेंतर्गत बांधकाम विषयक मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. अखेर ढोरेगावच्या जिल्हा परिषद शाळेच्या 6 वर्गखोल्यांचे नव्याने बांधकाम करण्यात आले .

➩ विनाअनुदानित शाळांना प्रचलित धोरणानुसार 100 टक्के अनुदान द्या, दिनांक 1 नोव्हेंबर 2005 पूर्वीच्या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करा, बाह्य एजन्सीद्वारे कंत्राटी पद्धतीने नोकर भरतीचा शासन निर्णय रद्द करा, शिक्षक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरा, वरिष्ठ महाविद्यालयांचा 'कायम' शब्द काढून अनुदान द्यावे आदी मागण्यांसाठी 24 मार्च 2023 रोजी विधी मंडळाच्या पायऱ्यांवर धरणे आंदोलन केले.

➩ मराठवाड्यातील कार्यरत असलेल्या शैक्षणिक संस्थांच्या विविध अडीअडचणी संदर्भात छत्रपती संभाजीनगर शहरातील सरस्वती भुवन शिक्षण संस्थेच्या कार्यालयात शैक्षणिक संस्था चालकांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस उपस्थित होतो. यात प्रामुख्याने आगामी होणारी पवित्र पोर्टल भरती, शिक्षकेतर कर्मचारी भरती यासंदर्भात प्रामुख्याने चर्चा करण्यात आली. याप्रसंगी सरस्वती भुवन शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री.दिनेश वकील, सरचिटणीस डॉ.श्रीरंग देशपांडे यांच्यासह मराठवाड्यातील विविध संस्थांचे संस्था चालक उपस्थित होते..

➩ छत्रपती संभाजीनगर शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून सन 2022-23 यावर्षीची अकरावीची प्रवेश प्रक्रिया पुन्हा 'ऑनलाइन' पध्दतीने राबविण्यात येणार होती. तसा प्रस्ताव देखील शासनाकडे सादर करण्यात आला होता. मात्र 'ऑनलाइन' प्रवेश प्रक्रिया विद्यार्थी, पालकांसाठी अत्यंत किचकट व वेळखाऊ असल्याने छत्रपती संभाजीनगर शहरातील अकरावीची प्रवेश प्रक्रिया 'ऑफलाइन' पध्दतीनेच राबविण्यात यावी अशी मागणी मी 8 मे 2022 रोजी राज्याच्या तत्कालीन शालेय शिक्षण मंत्री मा.ना.वर्षाताई गायकवाड यांच्याकडे केली होती. तसेच यासंदर्भात फोनव्दारे मा.वर्षाताई यांच्याशी चर्चा केली.अखेर माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक श्री.महेश पालकर यांनी यासंदर्भात मुंबई, पुणे, नाशिक, अमरावती, नागपूर विभागीय शिक्षण उपसंचालकांना पत्र पाठवले. या पत्रात त्यांनी आपल्या महानगरपालिका क्षेत्रातील सन 2022-23 मध्ये अकरावीची प्रवेश प्रक्रिया 'ऑनलाइन' पध्दतीने राबविण्यात यावी असे नमूद केले व उर्वरित महाराष्ट्रातील प्रवेश प्रचलित म्हणजेच 'ऑफलाइन' पध्दतीनुसार करण्यात येतील असे म्हटले होते. त्यामुळे सन 2022-23 या शैक्षणिक वर्षासाठी छत्रपती संभाजीनगर शहरातील महाविद्यालयात अकरावीचे प्रवेश 'ऑफलाइन' पध्दतीने करण्यात आले.

➩ राज्याच्या तत्कालीन शालेय शिक्षण मंत्री मा.ना.वर्षाताई गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत 23 मार्च 2022 रोजी मुंबई येथील महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषद येथे शालेय शिक्षण विभागातील विविध प्रलंबित प्रश्नांविषयी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस उपस्थित होतो. यामध्ये अल्पसंख्याक संस्थेतील पदभरती, अनुकंपा धोरण, अर्धवेळ ग्रंथपाल, मुलींच्या उपस्थिती भत्या बाबत, अंशतः अनुदानित शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवा संरक्षण देणे, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या अडीअडचणी, वाढीव पदांना मान्यता, अघोषित शाळा, आयटी शिक्षक, आश्वासीत प्रगती योजना, आदी विषयांवर बैठकीत सकारात्मक चर्चा करण्यात आली.

➩ जुनी पेन्शन योजनेसंदर्भात जुक्टा शिक्षक संघटनेच्या शिष्टमंडळासह 17 एप्रिल 2026 रोजी छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय शिक्षण उपसंचालक श्री.कैलास दातखीळ यांची भेट घेतली. नोव्हेंबर 2005 पूर्वी अंशत: अनुदानित पदावर नियुक्त खाजगी उच्च माध्यमिक, माध्यमिक, प्राथमिक शाळेतील शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यासंदर्भात त्वरित योग्य ती कार्यवाही करावी अशी मागणी विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्याकडे केली. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक 2345/2014 मधील दिनांक 27 फेब्रुवारी 2025 रोजीच्या निर्णयान्वये राज्यातील अनुदानित खाजगी उच्च माध्यमिक, माध्यमिक, प्राथमिक शाळांमधील 1 नोव्हेंबर 2005 पूर्वी अंशत: अनुदानित पदावर कार्यरत असलेल्या शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जुनी भविष्य निर्वाह निधी योजना लागू करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व वेतन अधीक्षक कार्यालयाने उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांकडून गुगल फॉर्मव्दारे माहिती गोळा केली व उपसंचालक कार्यालयाकडे पाठवली. सदरील माहितीच्या आधारे 942 कनिष्ठ महाविद्यालय प्राध्यपकांची, 3737 माध्यमिक शिक्षकांची, 1127 प्राथमिक शिक्षकांची सर्व माहिती शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडे प्राप्त झाली. सदरील माहिती आपल्या कार्यालयाकडे प्राप्त होऊन सहा महिने झाले मात्र यासंदर्भात अद्यापही काहीच कार्यवाही झाली नसल्याचे उपसंचालक श्री.कैलास दातखीळ यांच्या निदर्शनास आणून दिले. त्यामुळे सदरील शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत त्वरित योग्य ती कार्यवाही करावी अशी मागणी केली. संबंधित सर्व शिक्षकांच्या प्रस्तावाची छाननी करून पात्र शिक्षकांची यादी लवकरच जाहीर करण्यात येईल असे श्री.कैलास दातखीळ यांनी यावेळी आश्वस्त केले. याप्रसंगी जुक्टा शिक्षक संघटनेचे पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते.




शिक्षकांच्या विविध मागण्या संदर्भात विधिमंडळाच्या पायऱ्यांवर पदवीधर व शिक्षक आमदारांसोबत धरणे आंदोलन करतांना.




जुनी पेन्शन योजना लागू करण्यासंदर्भात विभागीय शिक्षण उपसंचालक श्री.कैलास दातखीळ यांना निवेदन देतांना.



मराठवाड्यातील कार्यरत असलेल्या शैक्षणिक संस्थांच्या विविध अडीअडचणी संदर्भात शैक्षणिक संस्था चालकांच्या बैठकीत चर्चा करतांना.



संच मान्यता व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरतीबाबत राज्याचे तत्कालीन शालेय शिक्षण मंत्री मा.ना.दादाजी भुसे यांच्या सोबत चर्चा करतांना.



राज्यातील अनुदानासाठी घोषित केलेल्या शाळा/तुकड्यांना पुढील 20 टक्के वाढीव टप्पा अनुदान देण्याचा निर्णय घेतल्या बद्दल तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा अर्थ मंत्री मा.ना.अजितदादा पवार यांची सदिच्छा भेट घेऊन आभार मानले.

➪ जालना येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू व्हावे यासाठी वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयांनी 21 फेब्रुवारी 2023 रोजी सदरील महाविद्यालयासाठी जालना येथील उपलब्ध 25 एकर जागेसह प्रस्ताव पाठवूनही सन 2023 मध्ये झालेल्या अर्थसंकल्पात याचा कुठेही उल्लेख करण्यात आलेला नव्हता. विधी मंडळाच्या पायऱ्यांवर बसून शासनाच्या अर्थसंकल्पाचा व धोरणाचा जाहीर निषेध करून जालना येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय घोषित करून भरीव निधी उपलब्ध करून द्यावा अशी आग्रही मागणी केली. आज जालना येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू झाले आहे.

➪ खुलताबाद येथे ट्रामा केअर युनिटसाठी निधी उपलब्ध करून द्यावा यासाठी मी शासनस्तरावर वेळावेळी पाठपुरावा करीत होतो. अखेर माझ्या मागणीला यश आले. सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन 2025-26 योजने अंतर्गत खुलताबाद येथील ट्रामा केअर युनिटसाठी 13 कोटी आठ लक्ष रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

खुलताबाद येथे ट्रामा केअर युनिट मंजूर करावे यासाठी मी 26 डिसेंबर 2022 रोजी विधान परिषदेत तारांकित प्रश्न उपस्थित करून सभागृहाचे लक्ष वेधले होते. माझ्या प्रश्नाला उत्तर देतांना तत्कालीन सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांनी खास बाब म्हणून खुलताबादेत ट्रामा केअर युनिट मंजूर करत असल्याची घोषणा सभागृहात केली होती. त्यानंतर यासंदर्भात 20 जुलै 2023 रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. मात्र सदरील ट्रामा केअर युनिटसाठी निधी मिळत नसल्याचे मी राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री मा.ना.अजितदादा पवार, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मा.ना.संजयजी शिरसाठ यांची भेट घेऊन सदरील ट्रामा केअर युनिटच्या कामासाठी 'डीपीडीसीतून' निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. अखरे माझ्या मागणीला यश आले असून सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन 2025-26 योजने अंतर्गत खुलताबाद येथील ट्रामा केअर युनिटसाठी 13 कोटी आठ लक्ष रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली. सदरील काम प्रगतीपथावर आहे.

➪ छत्रपती संभाजीनगर शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात (घाटी) नवीन शस्त्रक्रिया इमारत उभारणीसाठी 710.25 कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. 21 मार्च 2025 रोजी घाटीत नवीन शस्त्रक्रिया इमारत उभारण्यासंदर्भात मी विधान परिषदेत तारांकित प्रश्न उपस्थित करून सभागृहाचे लक्ष वेधले होते. अखेर माझ्या मागणीला यश आले आहे. या नवीन शस्त्रक्रिया इमारतीचे बांधकाम अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळाली असून यासंदर्भात वैद्यकीय शिक्षण विभागाच्यावतीने 24 एप्रिल 2025 रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. सदरील शासन निर्णय निर्गमित केल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.देवेंद्रजी फडणवीस साहेब, तत्कालीन उपमुख्यमंत्री मा.ना.अजितदादा पवार, मा.ना.एकनाथजी शिंदे साहेब, वैद्यकीय शिक्षणमंत्री मा.ना.हसनजी मुश्रीफ साहेब यांचे आभार मानले.

➪ वैद्यकीय प्रवेश प्रक्रियेतील विभागानुसार 70:30 कोटा आरक्षण रद्द करणारा शासनाचा निर्णय औरंगाबाद खंडपीठाने 18 / 12/ 2020 रोजी कायम केला, तसेच शासनाच्या परिपत्रकास आव्हान देणाऱ्या सर्व याचिका फेटाळल्या आहेत. वैद्यकीय प्रवेशाचा 70:30 कोटा रद्द करावा यासाठी मी शासनस्तरावर वेळोवेळी पाठपुरावा केला. विधान परिषदेत लक्षवेधी, तारांकित प्रश्न याव्दारे सदरील प्रश्नाला वाचा फोडून सभागृहाचे लक्ष वेधले. तत्कालीन सरकारने देखील माझ्या मागणीची दखल घेत हा 70:30 कोटा रद्द केला. मात्र शासनाच्या या निर्णयाच्या विरोधात औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. त्यामुळे शासनाचा निर्णय योग्य असल्या संदर्भात मी देखील औरंगाबाद खंडपीठात हस्तक्षेप याचिक (Application for intervention) दाखल केली होती. अखेर न्या.एस.व्ही.गंगापूरवाला आणि न्या.एस.डी.कुलकर्णी यांच्या खंडपीठाने शासनाचा निर्णय कायम करून शासनाच्या निर्णयास आव्हान देणाऱ्या सर्व याचिका फेटाळल्या. त्यामुळे मराठवाड्यातील गुणवत्ता धारक विद्यार्थ्यांवर होणारा अन्याय देखील अखेर दूर झाला. माझ्यावतीने ॲड.नंदकुमार खंदारे यांनी काम पाहिले.

➩ राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत आरोग्य संस्थांमध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांच्या भरती प्रक्रियेत 25 टक्के जागा 'बीएएमएस' (आयुर्वेद) डॉक्टरांसाठी राखीव ठेवाव्यात अशी मागणी मी 30 जून 2026 रोजी विशेष उल्लेखाद्वारे विधान परिषदेत केली. महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ संवर्गात सरळसेवा भरतीसाठी शासन निर्णय 4 सप्टेंबर 2014 नुसार 25 टक्के जागा 'बीएएमएस' (आयुर्वेद) डॉक्टरांसाठी राखीव असाव्यात असा निर्णय घेण्यात आला होता. 31 जानेवारी 2024 च्या जाहिरातीमध्ये वैद्यकीय अधिकारी पदभरती करिता 20 टक्के जागा 'बीएएमएस' तर 80 टक्के जागा 'एमबीबीएस' डॉक्टरांसाठी राखीव ठेवण्यात आल्या होत्या. मात्र 27 फेब्रुवारी 2026 रोजी राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत आरोग्य संस्थांमध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या 1440 रिक्त पदांच्या भरतीकरिता निघालेल्या जाहिरातीत 'बीएएमएस' डॉक्टरांसाठी एकही जागा राखीव ठेवण्यात आली नसल्याचे विशेष उल्लेखाद्वारे सभागृहाच्या निदर्शनास आणून देत यापुढील भरती प्रक्रियेत शासन निर्णय 4 सप्टेंबर 2014 नुसार 25 टक्के जागा 'बीएएमएस' (आयुर्वेद) डॉक्टरांसाठी राखीव ठेवाव्यात अशी मागणी केली..



आरोग्य विभागातील रिक्त पदांच्या भरती प्रक्रियेत 25 टक्के जागा 'बीएएमएस' (आयुर्वेद) डॉक्टरांसाठी राखीव ठेवाव्यात अशी मागणी राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री मा.ना.प्रकाशजी आबिटकर यांच्या कडे करतांना.

➩ छत्रपती संभाजीनगर शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाला (घाटी) अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेचा 'एम्स'चा दर्जा मिळावा यासाठी 27 फेब्रुवारी 2026 रोजी विधान परिषदेत लक्षवेधी सूचना उपस्थित करून सभागृहाचे लक्ष वेधले. सुमारे 70 वर्षपूर्वी स्थापन झालेल्या घाटी रुग्णालयात मराठवाड्यासह विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रातील बहुतांशी रुग्ण हे वैद्यकीय उपचारासाठी येतात. रुग्णांना योग्य वैद्यकीय उपचार व भौतिक सुविधा मिळण्यासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयास 'एम्स'चा दर्जा मिळाला तर या वैद्यकीय संस्थेस दोन ते तीन हजार कोटींचे अतिरिक्त अर्थसहाय्य मिळू शकते आणि या निधीतून वैद्यकीय संस्थेची सेवा सुविधांचा स्तर व गुणवत्ता उच्च पातळीवर नेण्यास सुलभ होईल असे लक्षवेधीच्या माध्यमातून सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. या प्रश्नाला उत्तर देतांना वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी घाटीला 'एम्स'चा दर्जा देण्यासंदर्भात शासन सकारात्मक असून यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्फत केंद्र शासनाकडे पाठपुरावा केला जाईल असे सभागृहात सांगितले.



जालना येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू व्हावे या मागणीसाठी विधी मंडळाच्या पायऱ्यांवर आंदोलन करतांना.

➪ राज्याचे कृषी मंत्री मा.ना. दत्तात्रयजी भरणे यांची 8 सप्टेंबर 2026 रोजी मुंबई येथे भेट घेतली. मराठवाड्यात यावर्षी पावसा अभावी बाधित झालेल्या पिकांचे त्वरित पंचनामे करून शासनाची आर्थिक मदत व पीक विम्याची नुकसान भरपाई देऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी कृषी मंत्री महोदयांकडे केली. मराठवाड्यात पावसाने घेतलेल्या प्रदीर्घ विश्रांतीमुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. खरीप हंगामाच्या सुरुवातीच्या काळात मराठवाड्यात अल्प व अनियमित पाऊस झाला. मात्र आता बऱ्याच दिवसांपासून पाऊस नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या डोळ्यांसमोर त्यांच्या शेतातील पिके उध्दस्त होत आहेत. ज्या पिकांकडे मोठ्या आशेने पाहिले होते तेच पीक आता त्यांच्या डोळ्यासमोर जळताना पाहण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. एका बाजूला शेतीत केलेला खर्च वाया जाण्याची भीती तर दुसऱ्या बाजूला डोक्यावर असलेले कर्ज फेडण्याची चिंता अशा आर्थिक व मानसिक संकटातून शेतकरी जात आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह, मुलांचे शिक्षण, घरातील दैनंदिन खर्च, कर्जाची परतफेड असे विविध प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभे राहिले असल्याचे कृषी मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. अखेर माझ्या मागणीची दखल घेत शासनाने 25 सप्टेंबर 2026 रोजी राज्यात दुष्काळ जाहीर केला.

➪ बदनापूर येथील कृषी संशोधन केंद्राच्या विकासकामांसाठी व संशोधनासाठी निधी उपलब्ध करून देण्यासंदर्भात 17 मार्च 2025 रोजी मी विधान परिषदेत तारांकित प्रश्न उपस्थित करून सभागृहाचे लक्ष वेधले. बदनापूर येथील कृषी संशोधन केंद्र 1951 मध्ये स्थापन करण्यात आले असून सदर केंद्राअंतर्गत कडधान्य संशोधन गुणवत्ता व कडधान्य बिजोत्पादन प्रकल्प राबविले जातात. मात्र 1951 पासून सदरील संशोधन केंद्र व बिजोत्पादन प्रकल्पाच्या विकासकामांसाठी व संशोधनासाठी शासनाने निधी उपलब्ध करून दिलेला नाही. त्यामुळे या कृषी संशोधन केंद्राच्या संशोधनासाठी तातडीने निधी उपलब्ध करून देण्याची आग्रही मागणी सभागृहात केली होती. अखेर माझ्या मागणीची दखल घेऊन राज्य शासनाने 20 जानेवारी 2026 रोजी शासन निर्णय निर्गमित करून येथील कडधान्य संशोधन गुणवत्ता केंद्राच्या बळकटीसाठी रु.11 कोटी रुपयांच्या प्रस्तावास मान्यता दिली. कृषी संशोधनाच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण प्रश्न मार्गी लावला.

➪ शालेय स्तरावर कृषी अभ्यासक्रमाचा समावेश करावा अशी मागणी 6 मार्च 2025 रोजी विधान परिषदेत विशेष उल्लेखाव्दारे केली आहे. शालेय स्तरावर कृषी अभ्यासक्रमाचा समावेश करण्यासाठी ज्येष्ठ कृषीतज्ज्ञ डॉ.राजाराम देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली 2005 मध्ये समिती करण्यात आली होती. या कृषी अभ्यासक्रम निश्चितीकरण समितीने 2006 मध्ये तत्कालीन कृषीमंत्री आणि शालेय शिक्षण मंत्री यांना शालेय स्तरावर कृषी अभ्यासक्रम सुरु करण्याची शिफारस करणारा अहवाल सादर केला. मात्र मागील 19 वर्षांपासून हा अहवाल शासनस्तरावर प्रलंबित असून यासंदर्भात काहीच कार्यवाही करण्यात आली नसल्याचे विशेष उल्लेखाव्दारे सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी मध्येच शाळा सोडतात. यातून आर्थिक दुरवस्था निर्माण होते आणि ते तीव्र स्पर्धेत तग धरु शकत नाहीत. अशांना प्राथमिक शिक्षणापासूनच कृषी संबंधित महत्त्वाचे विषय सोप्या पद्धतीने शिकवता आले तर ते घरची शेती अधिक सजगतेने, हुशारीने सांभाळू शकतील. हेच विद्यार्थी भविष्यात आपल्या शेतीत प्रयोग करु शकतील आणि पूरक उद्योगांची जोड देऊ शकतील. ग्रामीण व शहरी भागातील संवाद वाढेल असा हा अभ्यासक्रम सुरु करण्यामागील उद्देश होता असे सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

➪ राज्याचे सहकार मंत्री मा.ना.बाबासाहेबजी पाटील यांची 19 ऑगस्ट 2026 मुंबई येथे भेट घेतली. शासनाने सन 2026 मध्ये राज्यातील शेतकऱ्यांसाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' जाहीर केली. मात्र काही थकीत कर्जदार शेतकरी मयत झाले असल्याने सदरील शेतकऱ्यांकडे फार्मर आयडी नसल्याने कर्जदार शेतकऱ्यांच्या 7/12 उताऱ्यावर कर्जाचा बोजा दिसणार आहे. त्यामुळे जे कर्जदार शेतकरी मयत झाले आहेत परंतु त्यांच्याकडे फार्मर आयडी नसल्याने त्यांच्या वारसांना कर्जमुक्तीचा लाभ मिळण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी अशी विनंती सहकार मंत्री महोदयांकडे केली.



नवी दिल्ली येथील भारतीय कृषी अनुसंधान परिषद या कृषी क्षेत्रातील अग्रणी असलेल्या संस्थेत IARI चे उपसंचालक डॉ.सी.विश्वनाथन यांच्यासोबत झालेल्या बैठकीत शेतीमध्ये आधुनिक व अद्ययावत तंत्रज्ञान, ड्रोन तंत्रज्ञान, डेटा विश्लेषण, मोबाईल ॲप, कृत्रिम बुद्धिमत्ता आदींबाबत सविस्तर चर्चा झाली. या प्रसंगी उपस्थित होतो.



मराठवाड्यातील केशर आंबा पीक उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी मा. ना. सुनेत्रावहिनी पवार यांच्याकडे करतांना.



ऑनलाइन खत विक्रीची सक्ती शिथिल करून खत विक्री ऑफलाइन पध्दतीने सुरु ठेवावी अशी मागणी कृषी मंत्री मा.ना.दत्तात्रयजी भरणे यांच्याकडे करतांना.



शेतकऱ्यांच्या वारसांना कर्जमुक्तीचा लाभ द्या. अशी मागणी राज्याचे सहकार मंत्री मा.ना.बाबासाहेबजी पाटील यांच्याकडे करतांना.



नवी दिल्ली येथील भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या "ड्रोन टेक्नॉलॉजी सेंटर"ला 22 जुलै 2025 रोजी भेट दिली. या सेंटरमधील संशोधक विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

➪ राज्याच्या उपमुख्यमंत्री मा.ना.सुनेत्रावहिनी पवार यांची 5 ऑगस्ट 2026 रोजी मुंबई येथे भेट घेतली. दिल्ली येथे 13 ते 19 जानेवारी 2025 या कालावधीत पहिली विश्वचषक खो-खो स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत भारताच्या पुरुष आणि महिला खो-खो संघाने सुवर्णपदक पटकावले होते. या स्पर्धेत भारतीय संघाकडून खेळलेल्या महाराष्ट्रातील खेळाडूंना क्रीडा विभागाच्या 7 ऑक्टोबर 2024 च्या शासन निर्णयानुसार रोख बक्षीस रक्कम मिळणे अपेक्षीत होते. मात्र ही रक्कम अद्यापही प्राविण्य प्राप्त खेळाडूंना मिळालेली नसून त्यांना ती बक्षीस रक्कम तसेच शासकीय सेवेत नोकरी देण्यात यावी अशी आग्रही मागणी उपमुख्यमंत्री महोदयांकडे केली. यासंदर्भात त्वरित योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना मा.ना. सुनेत्रावहिनी पवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

➪ विधी मंडळातील माझे तत्कालीन सहकारी विजय ऊर्फ भाई गिरकर यांनी 14 मार्च 2022 रोजी विधान परिषदेत क्रीडा क्षेत्राशी संबंधीत लक्षवेधी उपस्थित केली होती. या चर्चेत मी देखील सहभाग घेतला. राज्यातील खेळाडूंना उल्लेखनीय कार्याबद्दल ज्यावेळी शासनाचा क्रीडा पुरस्कार दिला जातो, त्याच वेळी त्या खेळाडूला शासकीय सेवेत थेट नियुक्ती द्यावी. क्रीडा शिक्षकांची भरती करताना क्रीडा शिक्षक हा खेळाडूच असायला हवा. यासाठी शालेय शिक्षण विभागाकडे पाठपुरावा करून अधिवेशन संपायच्या आधी धोरणात्मक निर्णय घ्यावा, राज्यात विविध तालुक्याच्या ठिकाणी दीड-दोन कोटी रुपये खर्च करून क्रीडा संकुले उभारण्यात आली आहेत. मात्र त्याठिकाणी खेळाडूंसाठी कुठलेच क्रीडा सहित्य उपलब्ध करून दिले जात नाही. त्यामुळे हे क्रीडा संकुले पांढरा हत्ती ठरू नये यासाठी क्रीडा संकुलांच्या उद्घाटनाआधीच सर्व क्रीडा साहित्य त्याठिकाणी उपलब्ध करून द्यावे, तसेच तेथे क्रीडा प्रशिक्षकांची देखील नियुक्ती करावी अशा विविध मागण्यांव्दारे मी सभागृहाचे लक्ष वेधले.

➪ म्हैसूर (कर्नाटक) येथे 5 ते 7 जुलै 2022 या दरम्यान अखील भारतीय आंतरविद्यापीठ महिला खो-खो स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. तब्बल 27 वर्षानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा महिला खो-खो संघ या स्पर्धेसाठी पात्र ठरला होता. स्पर्धेसाठी मिळणारे ट्रॅक सुट अनेक वेळा आमच्या मापाचे नसतात असे काही खेळाडूंनी माझ्या निदर्शनास आणून दिले होते. त्यामुळे या स्पर्धेसाठी खेळाडूंना मी ट्रॅक सुट दिले; तर दगडोजीराव देशमुख महाविद्यालयाचे संस्थापक श्री.विजय राऊत व त्यांच्या मित्र परिवाराने खेळाडूंना विमानाची तिकटे उपलब्ध करून दिली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ.प्रमोद येवले यांच्याकडे सदरील ट्रॅक सुट व विमानाची तिकीटे सुपूर्द केली. तसेच आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या विविध क्रीडा प्रकारातील खेळाडूंना दिल्या जाणाऱ्या दैनंदिन भत्त्यात वाढ करावी अशी मागणी डॉ. प्रमोद येवले यांच्याकडे केली होती.

➪ राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री स्व.अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त 11 ऑगस्ट 2026 रोजी छत्रपती संभाजीनगर येथील देवगिरी महाविद्यालयात जिल्हास्तरीय शालेय खो-खो स्पर्धा आयोजित केली होती. स्पर्धेचे पारितोषिक वितरण भारतीय खो-खो संघाची कर्णधार प्रियंका इंगळे यांच्या हस्ते झाले. स्व.अजितदादांना क्रीडा क्षेत्राबद्दल विशेष आत्मीयता होती. खेळाडूंनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राचे नाव उज्जवल करावे, ही त्यांची भूमिका होती. या स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना प्रत्येकी रोख रु.अकरा हजार तर उपविजेत्या संघांना रोख रु.सात हजार, चषक, प्रमाणपत्र प्रियंका इंगळे यांच्या हस्ते देण्यात आले.

पहिल्या विश्वचषक खो-खो स्पर्धेत भारतीय संघाकडून खेळलेल्या महाराष्ट्रातील खेळाडूंना रोख बक्षीस रक्कम तसेच शासकीय सेवेत नोकरी देण्यात यावी अशी आग्रही मागणी राज्याच्या उपमुख्यमंत्री मा.ना.सुनेत्रावहिनी पवार यांच्याकडे करतांना.





म्हैसूर (कर्नाटक) येथे 5 ते 7 जुलै 2022 या दरम्यान अखील भारतीय आंतरविद्यापीठ महिला खो-खो स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. तब्बल 27 वर्षानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा महिला खो-खो संघ या स्पर्धेसाठी पात्र ठरला होता. सदरील खेळाडूंना स्पर्धेसाठी शुभेच्छा देतांना.

भारतीय खो-खो संघाची कर्णधार प्रियंका इंगळे हिचा सत्कार करतांना.



➪ राज्यामध्ये सन 2025 मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी झाल्याने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले होते . या अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सामाजिक जाणिवेतून मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाने पुढाकार घेत मुख्यमंत्री सहायता निधीत रु.1 कोटीचा निधी जमा केला आहे. सदरील निधीचा धनादेश राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.देवेंद्रजी फडणवीस साहेब, तत्कालीन उपमुख्यमंत्री मा.ना.अजितदादा पवार यांच्याकडे 8 डिसेंबर रोजी सुपूर्द केला. स्व.यशवंतराव चव्हाण साहेबांच्या दातृत्वाने तसेच स्व.विनायकराव पाटील व स्व.दादासाहेब सावंत यांच्या पुढाकारातून 1958 साली सुरू झालेली मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ ही शैक्षणिक संस्था आज अविरतपणे ज्ञानदानाचे कार्य करीत असून ज्ञानदानाबरोबरच सामाजिक भान देखील जपण्याचे काम करत आली आहे. ज्या-ज्या वेळेस देशावर, राज्यावर नैसर्गिक प्रकारची आपत्ती आली त्या-त्या वेळी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाने सामाजिक बांधिलकी जपत या संकटाचा सामना करण्यासाठी खारीचा वाटा उचलण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. भूकंप, महापूर, दुष्काळ, कोविड अशा नैसर्गिक आपत्तीमध्ये म.शि.प्र.मंडळाने अनेक वेळा स्वयंस्फूर्तीने मदत केली आहे.

➪ क्रांतिसूर्य महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. या स्थापनेस दीड शतक उलटले. शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्षाचे निमित्त साधून सत्यशोधक समाज प्रतिष्ठान छत्रपती संभाजीनगर यांच्यावतीने 24 सप्टेंबर 2022 रोजी छत्रपती संभाजीनगर येथे एक दिवसाचे 'सत्यशोधक समाज अधिवेशन' आयोजित करण्यात आले होते. स्वागताध्यक्ष या नात्याने अधिवेशनास उपस्थित होतो.

श्रमिक मुक्ती दलाचे अध्यक्ष डॉ. भारत पाटणकर यांच्याहस्ते या अधिवेशनाचे उद्‌घाटन झाले. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत, साहित्यिक, मा.कुलगुरु डॉ.जनार्दन वाघमारे सरांची उपस्थिती होती. सत्यशोधक समाज प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री.के.ई.हरिदास, माजी अध्यक्ष श्री.उत्तमराव पाटील, कोषाध्यक्ष श्री.चेतन राऊत, सदस्य ॲड.द.रा.शेळके, श्री.सुभाष लोमटे, श्री.अंकुशराव भालेकर, डॉ.मच्छिंद्र गोर्डे, श्री.विजय राऊत आदी यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

➪ महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त देवगिरी महाविद्यालयात 22 जुलै 2026 रोजी आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात जवळपास 1058 रक्तदात्यांनी रक्तदान करून स्व.अजितदादा पवार यांच्या स्मृतींना अनोख्या पध्दतीने अभिवादन केले. लोकोपयोगी, समाजहिताचे उपक्रम राबवण्यासाठी अजितदादा नेहमी आग्रही असायचे. समाजाप्रती असलेली बांधिलकी आणि गरजू रुग्णांना जीवनदान मिळावे या उदात्त हेतूने या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. अनेकांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान करून सामाजिक उत्तरदायित्वाचे दर्शन घडवत अजितदादांप्रती असलेले प्रेम, जिव्हाळा कृतीतून दाखवून दिला..

➪ मराठवाड्यातील रखडलेल्या रेल्वे प्रकल्पा संदर्भात तत्कालीन केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री मा.ना.रावसाहेबजी दानवे यांची 4 ऑगस्ट 2021 रोजी दिल्ली येथे सदिच्छा भेट घेतली. मराठवाड्याचे रेल्वे प्रश्न, मागण्या, सर्वेक्षण, प्रस्ताव वर्षानुवर्षे कागदावरच आहेत. मराठवाड्यातील रेल्वेचे रखडलेले प्रकल्प मार्गी लागले तर मराठवाड्याच्या औद्योगिक, शैक्षणिक विकासाबरोबरच पर्यटन वाढीस चालना मिळण्यास मदत होईल असे मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिले...

➪ वेरूळ (ता. खुलताबाद) येथे 11 ते 15 ऑक्टोबर दरम्यान नागरिकांसाठी गुडघे दुखी व कंबर दुखी आजारासंदर्भात मोफत तपासणी शिबीर आयोजित केले होते. चार दिवसांत 2500 हुन अधिक रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला. शिबिराच्या पहिल्या दिवशी एक हजार, दुसऱ्या दिवशी 500, तिसऱ्या दिवशी 600, चौथ्या दिवशी 400 हुन अधिक रुग्णांची प्राथमिक तपासणी करण्यात आली. यामधील जवळपास 950 हुन अधिक रुग्णांचे मोफत एक्स रे काढण्यात आले होते. मुंबई येथील प्रसिद्ध अस्थीरोग तज्ञ डॉ.अबी तुरब चुनिया यांच्या प्रमुख उपस्थितीत सदरील शिबिराचा समारोप झाला. एक्स रे काढलेल्या रुग्णांची त्यांनी तपासणी केली. याप्रसंगी उपस्थित राहून उपस्थित रुग्णांशी संवाद साधला.

➪ गंगापूर येथील श्री मुक्तानंद महाविद्यालयाच्या प्रांगणात 2 ते 3 डिसेंबर 2023 रोजी कविवर्य ना.धों. महानोर साहित्य नगरीत 43 वे मराठवाडा साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले होते. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रकाशदादा सोळंके यांच्या हस्ते सदरील संमेलनाचे उद्घाटन झाले. याप्रसंगी संमेलनाध्यक्ष श्री.जगदीश कदम, मावळते संमेलनाध्यक्ष शेषराव मोहिते, स्वागताध्यक्ष मा.आ.लक्ष्मणराव मनाळ, आ.विक्रमजी काळे, मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.कौतिकराव ठाले पाटील आदींची उपस्थिती होती. साहित्य व सांस्कृतिक वातावरण गंगापूर व परिसरात रुजविण्यासाठी हे साहित्य संमेलन उपयोगी ठरले.

➪ महाराष्ट्र सरकारने राज्यातील महिलांना स्वावलंबी, आत्मनिर्भर करण्यासाठी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' घोषित केली. या योजनेअंतर्गत महिलेला तिच्या स्वतःच्या बँक खात्यामध्ये दरमहा 1500 रु. जमा होणार होते मात्र सदरील योजनेतील जाचक अटी शिथिल कराव्यात अशी मागणी राज्याच्या महिला व बालविकास मंत्री मा.ना.आदितीताई तटकरे यांच्याकडे 1 जुलै 2024 रोजी केली होती. सदरील योजनेचा लाभ राज्यातील जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यांना मिळावा यासाठी राज्य सरकारने या योजनेतील अनेक जाचक अटी काल शिथिल केल्या. या योजनेतील जाचक अटी शिथिल केल्याबद्दल विधी मंडळात 3 जुलै 2024 रोजी महिला व बालविकास मंत्री मा. ना.आदितीताई तटकरे यांची भेट घेऊन त्यांचे आभार मानले.

➪ भानुदासराव चव्हाण प्रतिष्ठानच्यावतीने मी वेरूळ येथे मोफत गुडघे दुखी, कंबर दुखी तपासणी शिबीर आयोजित केले होते. या शिबीरात माटरगाव येथील श्री.रावसाहेब रोकडे उपस्थित होते. डॉक्टरांनी त्यांना तपासून 'हिप रिप्लेसमेंट' करण्याचा सल्ला दिला होता. यासाठी जवळपास साडेतीन ते चार लाख रु. खर्च अपेक्षित होता. श्री.रावसाहेब रोकडे यांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता भानुदासराव चव्हाण प्रतिष्ठानच्यावतीने त्यांचे मुंबई येथील सैफी हॉस्पिटलमध्ये 'हिप रिप्लेसमेंट'चे ऑपरेशन करून दिले. 17 जुलै 2026 रोजी माटरगाव येथे श्री.रावसाहेब रोकडे यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांच्या तब्येतेची विचारपूस केली.

➪ छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेच्या मुख्य नुतन इमारतीच्या प्रांगणात स्व.यशवंतराव चव्हाण यांचा पूर्णाकृती पुतळा उभारावा या मागणीसाठी राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मा.ना.संजयजी शिरसाठ यांची 9 ऑगस्ट 2025 रोजी शिष्टमंडळासह सदिच्छा भेट घेतली. छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेची प्रशासकीय इमारत ही निजामकालीन वास्तूमध्ये होती. ही वास्तू जीर्ण झाल्यामुळे शासनाने नवीन प्रशासकीय इमारत उभारणीचे काम हाती घेतले होते. सदरील नवीन प्रशासकीय इमारत उभारणीचे काम आता अंतिम टप्प्यात आले आहे. आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या दूरदृष्टीमुळे महाराष्ट्रात जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत अशी त्रिस्तरीय रचना अस्तित्वात आली. त्यामुळे छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेच्या या मुख्य नवीन प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात स्व.यशवंतराव चव्हाण यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा. या इमारतीच्या मुख्य प्रांगणात स्व.यशवंरावजी चव्हाण यांचा पूर्णाकृती पुतळा उभारला तर त्यांच्या कार्याचा तो गौरव तर ठरेलच शिवाय नवीन पिढीला त्यांचा पुतळा कायम प्रेरणा देणारा असेल असे मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिले. याप्रसंगी माजी जि.प.अध्यक्ष श्री.व्दारकाभाऊ पाथ्रीकर, श्री.रंगनाथराव जाधव, प्रा.विजय पाथ्रीकर, श्री.उदयसेन देशमुख, श्री.त्रिंबकराव पाथ्रीकर, श्री.दिलीप बनकर, प्रा.देगावकर, श्री.दत्ता भांगे आदींची उपस्थिती होती...

➪ छत्रपती संभाजीनगर शहर पाणीपुरवठा योजनेच्या अनुषंगाने 15 जुलै 2026 रोजी मुंबई येथे राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी उपस्थित होतो. शहरातील नवीन पाणीपुरवठा योजनेला होत असलेल्या विलंबासंदर्भात बैठक आयोजित करावी अशी मागणी मी 4 जुलै रोजी पत्राद्वारे मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केली होती. शहरासाठी जिव्हाळ्याचा असलेल्या या नवीन पाणीपुरवठा योजनेतील सर्व अडथळे त्वरित दूर करून छत्रपती संभाजीनगरकरांना मुबलक पाणी उपलब्ध होईल या अनुषंगाने तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना मा.मुख्यमंत्री महोदयांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

➪ राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त शैक्षणिक, सामाजिक, साहित्य, सांस्कृतिक, कला, क्रीडा, वैद्यकीय, उद्योग, कृषी अशा विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा छत्रपती संभाजीनगर शहरात 24 जुलै 2026 रोजी लोकनेते अजितदादा पवार सन्मान पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. दैनिक लोकमतचे संपादक श्री.संजय आवटे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. खरं तर समाजातील प्रत्येक घटकाला अजितदादा सोबत घेऊन चालायचे. मतभेद असू शकतात पण समाजहित हेच सर्वोच्च असले पाहिजे, हा त्यांचा संदेश आजही तितकाच प्रेरणादायी आहे. ज्या मान्यवरांचा सन्मान केला तेही आपापल्या क्षेत्रात समाजासाठी मोलाचे योगदान देत आहेत. ते करत असलेले कार्य समाजासाठी प्रेरणादायी आहे. हा पुरस्कार त्यांच्या कार्याचा सन्मान तर आहेच पण समाजासाठी अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा देणारा पण आहे. सर्व पुरस्कारप्राप्त मान्यवरांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

➪ मराठवाडा मुक्ती संग्राम चळवळीचे प्रमुख ठिकाण असलेल्या हिप्परगा (रवा), ता.लोहारा, जि.धाराशिव येथे बहुउद्देशीय इमारत बांधकामासाठी रु.2.50 कोटी तर मराठवाडा मुक्तीसंग्रामात अमूल्य योगदान देणारे मातोळा (ता.औसा, जि.लातूर) येथील थोर स्वातंत्र्य सेनानी क्रांतिवीर दत्तोबा भोसले यांचे मातोळा येथे स्मारक उभारण्यासाठी रु.1 कोटीचा निधी देण्याची मागणी मी राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री मा.ना.अजितदादा पवार यांच्याकडे केली होती. त्यावेळी आदरणीय दादांनी माझ्या मागणीची दखल घेत छत्रपती संभाजीनगर येथे सन 2023 मध्ये झालेल्या मंत्री मंडळाच्या बैठकीत हिप्परगा येथील बहुउद्देशीय इमारत बांधकामासाठी रु.2.50 कोटीचा तर क्रांतीवीर दत्तोबा भोसले यांचे मातोळा येथे स्मारक उभारण्यासाठी रु.1 कोटीचा निधी देण्याचा निर्णय घेतला. सदरील कामांसंदर्भात शासनस्तरावर पाठपुरावा सुरु आहे.

➪ गंगापूर शहरासाठी जिव्हाळ्याची असलेली वाढीव क्षमतेची, अद्ययावत व सर्वसमावेश पाणीपुरवठा योजनेबाबत आढावा बैठक घेण्याची विनंती मी मा.ना.सुनेत्रावहिनी पवार यांच्याकडे केली होती. त्यानुसार 19 ऑगस्ट 2026 रोजी मुंबई येथे उपमुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. गंगापूर शहरासाठी सन 2017 मध्ये 4.5 एमएलडी क्षमतेची पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आली होती. मात्र सध्याच्या घडीला गंगापूर शहराची लोकसंख्या सुमारे 45000 पर्यंत झाली असून यामुळे पाणीपुरवठ्याची मागणी मोठ्या प्रमाणात वाढलेली असल्याने सध्याची पाणीपुरवठा योजना अपुरी ठरत असल्याचे या बैठकीत निदर्शनास आणून दिले. शहराला शुध्द व नियमित पाणीपुरवठा करण्यात अडचणी निर्माण होत असून गंगापूर शहरासाठी वाढीव 8.5 एमएलडी क्षमतेची अद्ययावत व सर्वसमावेशक पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करावी अशी मागणी या बैठकीत केली. उपमुख्यमंत्री मा.ना.सुनेत्रावहिनी पवार यांनी माझ्या मागणीची दखल घेत गंगापूर शहरासाठी वाढीव क्षमतेची पाणीपुरवठा योजना त्वरित पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

➪ करमाड (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील श्री.बालाजी वाघ यांचा चार वर्षांचा चिरंजीव सार्थक याच्या हृदयाला छिद्र असल्याचे निदान झाले होते. छत्रपती संभाजीनगर येथील एका हॉस्पिटलने सार्थकची शस्त्रक्रिया करण्याचे सुचविले होते. मात्र सदरील शस्त्रक्रियेसाठी सहा लाख रुपयांचा खर्च येणार होता. श्री.बालाजी वाघ यांचा करमाडला सलूनचा व्यवसाय असून सहा महिन्यांपूर्वी त्यांनी सदिच्छा भेट घेऊन वरील बाब माझ्या निदर्शनास आणून दिली होती. त्यांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता भानुदासराव चव्हाण प्रतिष्ठानच्यावतीने मुंबई येथील सर एच.एन.रिलायन्स फाउंडेशन हॉस्पिटलमध्ये सार्थकच्या हृदयाची शस्त्रक्रिया मोफत करून देण्यात आली. 27 जुलै 2025 करमाड येथे एका कार्यक्रमानिमित्त गेलो असता श्री.बालाजी वाघ चिरंजीव सार्थक व पत्नी मनीषाताई यांच्या समवेत आभार मानण्यासाठी आवर्जून भेटायला आले. यावेळी सार्थकच्या तब्येतीची विचारपूस केली. तो आता पूर्णपणे बरा झाल्याचे ऐकून मनस्वी आनंद झाला...




राज्यामध्ये सन 2025 मध्ये मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी झाल्याने सामाजिक जाणिवेतून मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाने पुढाकार घेत मुख्यमंत्री सहायता निधीत रु.1 कोटीचा निधी जमा केला. सदरील निधीचा धनादेश राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.देवेंद्रजी फडणवीस साहेब, तत्कालीन उपमुख्यमंत्री मा.ना.अजितदादा पवार यांच्याकडे सुपूर्द करतांना.



सत्यशोधक समाज अधिवेशनात मा.कुलगुरू डॉ.जनार्दन वाघमारे यांचा सत्कार करतांना. याप्रसंगी सत्यशोधक समाज प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री.के.ई.हरिदास, प्रा.राम बाहेती.



प्रसिद्ध अस्थीरोग तज्ञ डॉ.अबी तुरब चुनिया यांच्या प्रमुख उपस्थितीत गुडघे दुखीआजारासंदर्भात मोफत तपासणी शिबीर आयोजित केले होते. यांप्रसंगी उपस्थित राहून उपस्थित रुग्णांशी संवाद साधला.



मराठवाड्यातील रखडलेल्या रेल्वे प्रकल्पाच्या संदर्भात तत्कालीन केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री मा.ना. रावसाहेबजी दानवे यांना निवेदन देतांना.



छत्रपती संभाजीनगर शहर पाणीपुरवठा योजनेच्या अनुषंगाने मुंबई राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी उपस्थित होतो.



स्व.अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. दैनिक लोकमतचे संपादक श्री.संजय आवटे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.



गंगापूर शहराच्या पाणीपुरवठा योजनेबाबत उपमुख्यमंत्री मा.ना.सुनेत्रावहिनी पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी उपस्थित होतो.



माटरगाव येथे श्री.रावसाहेब रोकडे यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांच्या तब्येतेची विचारपूस केली.



राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित रक्तदान शिबीरात रक्तदान करतांना.



43 व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे उद्घाटन करतांना मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रकाशदादा सोळंके. याप्रसंगी संमेलनाध्यक्ष श्री.जगदीश कदम, श्री.शेषराव मोहिते, स्वागताध्यक्ष मा.आ.लक्ष्मणराव मनाळ, आ.विक्रमजी काळे, प्राचार्य डॉ.कौतिकराव ठाले पाटील.

सन 2020 मध्ये झालेल्या मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत विजय मिळवला; पण विजयाचा आनंद साजरा करण्याची वेळ नव्हती कारण संपूर्ण जग कोविड संकटाशी लढत होतं. कोरोनाच्या महामारीने मराठवाड्यातील प्रत्येक कुटुंबाच्या मनात भीती निर्माण केली होती. रुग्णालयांमध्ये गर्दी होती, आरोग्य यंत्रणेवर प्रचंड ताण होता आणि प्रत्येक क्षण माणसाच्या जीवासाठी महत्त्वाचा ठरत होता. त्यावेळी मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. कोरोनाशी झुंज देणाऱ्या रुग्णांची, त्यांच्या नातेवाईकांची आणि आरोग्य कर्मचाऱ्यांची विचारपूस केली. डॉक्टर, नर्स, आरोग्य कर्मचारी यांच्याशी संवाद साधून त्यांच्या अडचणी समजून घेतल्या. त्या काळात एक गोष्ट सतत मनात होती केवळ रुग्णालयात उपचार मिळणे पुरेसे नाही; रुग्णाला वेळेत रुग्णालयापर्यंत पोहोचवणेही तितकेच महत्त्वाचे आहे. अनेक ठिकाणी रुग्णवाहिकांची कमतरता जाणवत होती. रुग्णवाहिका वेळेवर उपलब्ध न झाल्याने एखाद्या कुटुंबातील व्यक्तीचा जीव जाऊ नये, ही भावना मनात ठेवून माझ्या आमदार निधीतून विविध ठिकाणी रुग्णवाहिका उपलब्ध करून दिल्या. खरं तर मराठवाड्याच्या सुख-दुःखात सहभागी होणे, हीच माझी जबाबदारी होती आणि आजही आहे.



लातूर जिल्ह्याच्या ग्रामीण रुग्णालय, मुरुड येथे माझ्या स्थानिक विकास निधीतून रुग्णालयास उपलब्ध झालेल्या रुग्णवाहिकेच्या लोकार्पण प्रसंगी.



छत्रपती संभाजीनगर शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयास (घाटी) कोविडग्रस्त रुग्णांकरिता खरेदी करण्यात आलेली यंत्रसामुग्री घाटीच्या तत्कालीन अधिष्ठाता डॉ. कानन येळीकर यांच्याकडे सुपूर्द करतांना.



परभणी येथील जिल्हा सामान्य रुग्णालयास रुग्णवाहिका उपलब्ध करून रुग्णवाहिकेची चावी तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.बी.एस.नागरगोजे यांच्या कडे सुपूर्द केली.



अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयास रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली होती. 10 जानेवारी 2022 रोजी या रुग्णवाहिकेचे लोकार्पण केले.

उमरगा (जि.उस्मानाबाद) येथील उपजिल्हा रुग्णालयास रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली होती. 3 ऑक्टोबर 2021 रोजी फीत कापून या रुग्णवाहिकेचे लोकार्पण केले. तसेच उमरगा उपजिल्हा रुग्णालयाचे तत्कालीन प्रभारी वैद्यकीय अधिक्षक डॉ.विक्रम आंळगेकर यांच्याकडे रुग्णवाहिकेची चावी सुपूर्द केली.






धाराशिव येथील शासकीय सामान्य रुग्णालयास रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली होती. 3 ऑक्टोबर 2021 रोजी फीत कापून या रुग्णवाहिकेचे लोकार्पण केले.



छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील (घाटी)कोविड वॉर्डास भेट देऊन डॉक्टरांशी संवाद साधला.



हिंगोली येथील जिल्हा सामान्य रुग्णालयास 22 मे 2021 रोजी भेट देऊन व्हेंटिलेटरची पाहणी केली.



नांदेड येथील जिल्हा रुग्णालयातील कोविड वॉर्डास 22 मे 2021 रोजी भेट देऊन कोविड बाधित रुग्णांशी संवाद साधत त्यांच्या अडी-अडचणी जाणून घेतल्या.

सन २०२६ च्या खरीप हंगामातील Trigger-१ (प्रथम कळ) लागू झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करुन विविध उपाययोजना व सवलती लागू करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**मदत व पुनर्वसन विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक:- समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२
दिनांक:- २५ सप्टेंबर, २०२६

**वाचा:-** १) शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण-२०१७/प्र.क्र.१७३/२०१७/३ दि.०७ ऑक्टोबर, २०१०
२) शासन निर्णय, क्रमांकः संकिर्ण-२०१७/प्र.क्र.१७३/२०१७/म-७, दि. २८ जून, २०१८
३) शासन पत्र क्रमांकः एससी वाय-२०२१/प्र.क्र.१००/म-७, दि. १८ ऑक्टोबर, २०२१
४) शासन निर्णय क्रमांक: एससीवाय-२०२३/प्र.क्र.३७/म-७, दि. ३१ ऑक्टोबर, २०२३
५) कृषी आयुक्त यांचा अहवाल दि. २४ सप्टेंबर २०२६

**प्रस्तावना:**

दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ नुसार राज्यातील दुष्काळी परिस्थितीचे मूल्यांकन करण्याबाबत संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक १ व २ अन्वये सविस्तर कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. खरीप २०२६ च्या हंगामातील परिस्थितीच्या आधारे राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती असल्याचे Trigger-१ (प्रथम कळ) संदर्भात आयुक्त कृषी यांच्या अहवाला वरून दिसून येते. सदरहू Trigger-१ (प्रथम कळ) नुसार दुष्काळी तालुके घोषित करणे व त्यामध्ये करावयाच्या विविध उपाययोजना व सवलती लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

शासन निर्णय क्रमांकः **समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२**

२. राज्यातील दुष्काळग्रस्त Trigger-१ (पहिली कळ) २६५ तालुक्यांत लागू असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे परिशिष्ट-१ मध्ये नमूद एकूण २६५ तालुक्यांतील दुष्काळग्रस्त भागासाठी राज्य शासनाकडून विशेष बाब म्हणून खालील उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

१) जमीन महसूलात सूट
२) पिक कर्जाचे पुनर्गठन
३) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसूलीस स्थगिती
४) कृषी पंपाच्या चालू विजबिलात सूट *(७.५ हॉर्सपावर पर्यंत क्षमतेच्या विजपंपाचे वीज बिल अगोदरच माफ करण्यात आले आहे. त्यावरील वीज पंपांना सदर सूट लागू असेल)*
५) शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात माफी

---

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ**
(नॅक मानांकित 'अ' श्रेणी)
'ज्ञानगंगोत्री', गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक- ४२२२२२
दूरध्वनी : कार्यालय (०२५३) २२३१७१४/१५, २२३०२२७, २२३०४५९ २२३००२४/२५/२७/२८

ज्ञानगंगा घरोघरी

**Yashwantrao Chavan Maharashtra Open University**
(NAAC Accredited 'A' Grade)
'Dnyangangotri', Near Gangapur Dam, Goverdhan, Nashik - 422 222
Phone : Office (0253) 2231714 / 15, 2230227, 2230459 2230024 / 25 / 27 / 28

**जावक क्र.: यचममुवि/बी.एड वि.शि/2026/18** | **दिनांक : 02.09.2026**

**प्रति,**
**मा. आ. श्री. सतीश चव्हाण साहेब,**
**औरंगाबाद पदवीधर मतदारसंघ.**

**विषय : दिव्यांग विद्यार्थ्यांच्या बी.एड. परीक्षा केंद्राबाबत.**

**महोदय,**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक अंतर्गत घेण्यात येणाऱ्या बी.एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रम परीक्षांमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांना त्यांच्या जिल्ह्याच्या ठिकाणी परीक्षा देता यावी, याबाबत केलेल्या विनंतीबद्दल विद्यापीठाच्या वतीने आपले मन:पूर्वक आभार.

विद्यापीठामार्फत दिव्यांग विद्यार्थ्यांना **शासनाच्या प्रचलित नियमांनुसार परीक्षा देताना आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात.** विद्यार्थ्यांना परीक्षेच्या वेळी कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी विद्यापीठाकडून आवश्यक ती दक्षता घेतली जाते.

तसेच, **यापुढील परीक्षांमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांना त्यांच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या जिल्ह्याच्या ठिकाणी उपलब्ध असणाऱ्या परीक्षाकेंद्रावर परीक्षा देता यावी, यासाठी प्रशासकीय बाबींचा विचार करून विद्यापीठ स्तरावर आवश्यक ते नियोजन करण्यात येईल.**

दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताच्या दृष्टीने आपण घेतलेल्या सकारात्मक भूमिकेबद्दल विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने आपले पुन्हा एकदा मन:पूर्वक आभार.

**आपला विश्वासू,**

**(प्रा. डॉ. सुरेंद्र पाटोळे)**
**कुलसचिव (प्र.)**

संकेतस्थळ / Website • www.ycmou.ac.in • http://ycmou.digitaluniversity.ac

सामाजिक न्याय विभागांतर्गत शासकीय मागासवर्गीय वसतीगृहातील इयत्ता ११ वी व १२ वी च्या वर्गामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना उन्हाळी सुट्टीच्या (Summer Vacation) च्या कालावधीमध्ये शासकीय वसतीगृहांमध्ये निवासाची सुविधा चालु ठेवण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक:-बीसीएच-२०२६/प्र.क्र.१०४/शिक्षण-2
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२
दिनांक :१८ मार्च, २०२६

**वाचा:-१. समाज कल्याण, सांस्कृतीक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, शासन निर्णय क्रमांक. बीसीएच-१०८२/१०३८५ (३८), का ३२, दि.१६ मे १९८४.**

**शासन परिपत्रक:-**

संदर्भाधिन क्र.१ येथील शासन निर्णयातील परिशिष्ट अ मधील तरतुदीनुसार सामाजिक न्याय विभागांतर्गत शासकीय मागासवर्गीय वसतिगृहातील मुलामुलींचे वसतिगृह प्रवेश नियमावलीतील अनु.क्र. ५ नुसार वसतिगृहात प्रवेश मिळालेल्या विदयार्थ्यांना शाळा/महाविद्यालय सुरू होण्यापूर्वीच्या अगोदरच्या दिवसापासून त्यांची वार्षिक परीक्षा पूर्ण झाल्यानंतरच्या दिवसापर्यंत वसतिगृहात राहता येईल, परंतु सदर काळात शैक्षणिक संस्थांना १० दिवस अगर जास्त सुट्टी असेल तर त्या मुदतीत भोजन अगर भत्ता मिळणार नाही. तसेच, वार्षिक परीक्षा संपल्यानंतर व पुढील शैक्षणिक वर्ष सुरू होण्याच्या काळात जर कोणत्याही विदयार्थ्यास शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखांच्या शिफारसीनुसार वसतिगृहात राहणे आवश्यक असेल तर समाजकल्याण अधिकारी, वर्ग १, यांचे लेखी परवानगीने तो / ती वसतिगृहात राहू शकतील. परंतु ह्या काळात त्यांना भोजन अगर भत्ता मिळणार नाही, असे नमुद केले आहे.

२. राज्यातील महाविद्यालयांमध्ये इयत्ता ११ वी व १२ वी च्या वार्षिक परीक्षा संपल्यानंतर उन्हाळी वर्ग (Summer Classes) घेण्यात येतात. तसेच, या कालावधीत MH-CET, NEET, JEE ची तयारी सुद्धा विद्यार्थी करीत असतात. तथापि, उन्हाळी सुट्टीच्या (Summer Vacation) च्या कालावधीमध्ये विभागांतर्गत शासकीय वसतिगृहे बंद असल्याने, उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत घेण्यात येणाऱ्या क्लासेस (Summer Classes) तसेच इंजिनिअरिंग/मेडिकल विषयांसी संबंधित परिक्षांसाठी तयारी करण्याकरिता विद्यार्थ्यांना निवासाची सुविधा उपलब्ध होत नसल्याने यापासून ते वंचित राहतात.

---

**क्रमांक:-** विपका-२०२६/प्र.क्र.१५१/ई-१७०११५४/मशि-२

**मंत्री**
**उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य**
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
cbpatil.minister@gmail.com
दिनांक : २९ जुलै, २०२६

**विषय:-** सन २०२३-२४ ची विद्यार्थ्यांची परिक्षा शुल्क परत मिळणेबाबत.

महोदय,

महाराष्ट्र विधानपरिषद सभागृहामध्ये दि.१७.१२.२०२४ रोजी उपस्थित केलेल्या विशेष उल्लेख सूचना क्र.१६ द्वारे उपस्थित केलेल्या उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, राज्यात शासन निर्णय दि.१८.१०.१९९३ अन्वये टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची विद्यापीठे व परिक्षा मंडळे यांचे परिक्षा शुल्क माफ करण्याची योजना कार्यान्वित आहे. या योजनेअंतर्गत टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात येते.

सन २०२३-२४ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथील तसेच या विद्यापीठाच्या अधिनस्त महाविद्यालयातील एकूण ४२५८३ विद्यार्थी " टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची परिक्षा शुल्क प्रतिपुर्ती योजनेअंतर्गत " पात्र ठरले होते. यापैकी ३६८६० विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्क प्रतिपुर्तीसाठी रू.२.५४ कोटी एवढा निधी वितरीत केलेला असून या सर्व विद्यार्थ्यांना प्रस्तुत योजनेअंतर्गत परिक्षा शुल्क प्रतिपुर्ती योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे. उर्वरित ५७२३ विद्यार्थ्यांशी संपर्क होऊ न शकल्याने या विद्यार्थ्यांसाठी आवश्यक निधी वितरित करता आलेला नाही.

आपला,

C. B. Patil
(चंद्रकांत दादा पाटील)

प्रति,
श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.
१०, सुप्रिया, ज्योतीनगर, औरंगाबाद
जि. औरंगाबाद, पिन-४३१००१.



मी एका सामान्य गरीब शेतकरी कुटुंबातील मुलगी. परिस्थितीशी दोन हात करत शिक्षण घेण्याचं आणि डॉक्टर होण्याचं स्वप्न मनात होतं. स्वप्न मोठं होतं; पण ते पूर्ण करण्याच्या मार्गात अनेक आर्थिक अडचणी होत्या. कधी प्रवेश फी, कधी पुस्तकांचा खर्च, कधी मेस आणि हॉस्टेलचा खर्च.... या सगळ्यामुळे माझ्या स्वप्नपूर्तीच्या आड अनेक प्रश्न उभे राहत होते. पण अशा कठीण काळात माननीय आणि माझ्यासाठी आदरणीय असलेले पदवीधर आमदार सतीशभाऊ चव्हाण माझ्यासाठी आधार बनून उभे राहिले. माझ्या घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्यामुळे MBBS च्या पहिल्याच वर्षापासून माझ्या शिक्षणाचा प्रवास संघर्षमय होता. या संघर्षाची माहिती श्री. आनंदगावकर सरांमार्फत भाऊंपर्यंत पोहोचली. एवढ्या मोठ्या जनसमुदायातून एका सामान्य शेतकरी कुटुंबातील मुलीची अडचण ओळखून भाऊ स्वतः माझ्या आई-वडिलांना भेटले आणि माझ्या शिक्षणातील अडथळे दूर करण्यासाठी मदतीचा हात पुढे केला. प्रवेश फी पासून पुस्तके, मेस, हॉस्टेल इतकेच नसून माझ्या PG च्या तयारीसाठी मला On Line क्लाससाठी एक Tab पण घेऊन दिला. त्यांनी केलेली मदत माझ्यासाठी केवळ आर्थिक मदत नव्हती; तर लहानपणापासून पाहिलेल्या डॉक्टर होण्याच्या स्वप्नाला मिळालेली नवी आशा होती. भाऊंमुळे माझ्या आर्थिक परिस्थितीची चिंता मला कधीच जाणवली नाही. त्यामुळे मी पूर्णपणे माझ्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करू शकले. त्यांच्या मदतीने आणि आशीर्वादानेच आज मी माझी MBBS Internship पूर्ण करत आहे. भाऊ माझ्या आयुष्यातील हा तुम्ही दिलेला आधार मी कधीही विसरणार नाही. तुम्ही माझ्यावर ठेवलेला विश्वास सार्थ ठरवण्याचा मी नेहमी प्रयत्न करेन आणि भविष्यात माझ्यासारख्या गरजू विद्यार्थ्यांना शक्य तितकी मदत करण्याचा प्रयत्न करेन. भाऊ मनापासून धन्यवाद..! भाऊ तुमच्या या मदतीचे ऋण शब्दात व्यक्त करणे केवळ अशक्य आहे.

**डॉ. स्वाती प्रमोद पवार**
बेलकुंड, ता. औसा, जि. लातूर



सन 2012 मध्ये माझ्या वडिलांचे निधन झाले. त्या वेळी आमच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट होती आणि माझे शिक्षण पुढे चालू ठेवणे जवळजवळ अशक्य वाटत होते. अशा कठीण प्रसंगी आमदार सतीशभाऊ चव्हाण माझ्या पाठीशी पालकासारखे खंबीरपणे उभे राहिले. माझ्या प्राथमिक शिक्षणापासूनच त्यांनी मला सर्व प्रकारची आर्थिक मदत केली. पुढे त्यांनी मला देवगिरी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट स्टडीज या महाविद्यालयात प्रवेश दिला आणि माझे संपूर्ण शैक्षणिक शुल्क माफ केले. त्यांच्या या उदार सहकार्यामुळेच मी इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन या शाखेतून माझे बी.टेक. शिक्षण पूर्ण करू शकलो. त्यांची मदत केवळ आर्थिक स्वरूपाची नव्हती. त्यांच्या मार्गदर्शनामुळे आणि प्रोत्साहनामुळे माझ्यात आत्मविश्वास निर्माण झाला. त्यामुळेच मला जगप्रसिद्ध "एआय" कंपनीत काम करण्याची संधी मिळाली, आणि आज मी भारतातील सर्वात मोठ्या आयटी कन्सल्टन्सी कंपनीत कार्यरत आहे. आज मी जे काही आहे, ते सतीशभाऊंच्या दातृत्वामुळे, मार्गदर्शनामुळे आणि त्यांनी माझ्यावर ठेवलेल्या विश्वासामुळेच आहे. त्यांचे ऋण शब्दांत व्यक्त करणे शक्य नाही. मी आयुष्यभर त्यांचा ऋणी राहील आणि त्यांच्याप्रमाणेच गरजू विद्यार्थ्यांना मदत करण्याचा माझा नेहमी प्रयत्न राहील.

**श्रवण विलास इनामदार**
छत्रपती संभाजीनगर

मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचा लोकप्रतिनिधी या नात्याने मागील 6 वर्षांत मी केलेल्या कामांना प्रसारमाध्यमांनी योग्य ती प्रसिद्धी दिली. त्यांच्या सहकार्यामुळेच मी केलेल्या कामांची माहिती मराठवाड्यातील जनतेपर्यंत पोहचू शकली. लोकशाहीचा हा 'चौथास्तंभ' माझ्या पाठीशी भक्कमपणे उभा राहिल्याने मला विकासकामे करण्याची प्रेरणा मिळत गेली. मराठवाड्यातील सर्व पत्रकार बंधू-भगिनींनी या विविध विकासकामांना प्रसिद्धी देऊन सहकार्य केल्याबद्दल मी त्यांचा शतशः ऋणी आहे.





स्व. यशवंतराव चव्हाण यांचा पुतळा उभारा

आ. सतीश चव्हाण यांची पालकमंत्री शिरसाट यांच्याकडे मागणी

खेळाडूंना बक्षिसाची रक्कम द्या

आमदार सतीश चव्हाण यांची मागणी

महिला रुग्णालयाचा पाळणा आता तरी लवकर हलणार का?

संलग्नीकरण शुल्कवाढ कायदेशीर नाही

सतीश चव्हाण यांचा आक्षेप; अन्यथा न्यायालयात जाण्याचा इशारा

महाविद्यालय संलग्नीकरण शुल्कात १० टक्के वाढ

भोसले घराण्याच्या समाधीस्थळांचे जतन, संवर्धन करा : चव्हाण

विधान परिषदेत विशेष उल्लेख

एक हजार रुग्णांची मोफत तपासणी

आ. सतीश चव्हाण यांचा समाजोपयोगी उपक्रम

मराठवाड्यातील आंबा उत्पादकांना नुकसान भरपाई द्या

आमदार सतीश चव्हाण यांची उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे मागणी

विद्यापीठाच्या उपकेंद्रास शैक्षणिक क्षेत्र घोषित करा

# क्विक Update

सारथीच्या संशोधक विद्यार्थ्यांची प्रलंबित फेलोशिप वितरित करा

आ. सतीश चव्हाण यांची विधान परिषदेत मागणी

वैद्यकीय अधिकारी भरतीत 'बीएएमएस' डॉक्टरांसाठी जागा राखीव ठेवा -आ. चव्हाण

सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे मागणी

वकिलाला झालेल्या मारहाण प्रकरणी संबंधितावर त्वरित कारवाई करा

आ.सतीश चव्हाण यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी

उन्हाळी सुटीतही विद्यार्थ्यांना वसतिगृहात राहता येणार

आमदार सतीश चव्हाण यांच्या प्रयत्नांना यश

ऑनलाईन खत विक्रीची सक्ती शिथिल करा

आ. सतीश चव्हाण यांची कृषिमंत्र्यांकडे मागणी

रक्तदानातून जपली समाजाप्रती बांधिलकी

स्व. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त समाजसेवेचा उपक्रम

महिला-बाल रुग्णालयाच्या बांधकामासाठी वाढीव निधी द्या

आ.सतीश चव्हाण यांची मागणी



आमदार सतीश चव्हाण यांच्या पाठपुराव्याला अखेर यश

'नांदूर मधमेश्वर'मधून पाणी सोडा-चव्हाण

अधिवेशनापूर्वी जोगेश्वरी येथे प्राथमिक आरोग्य केंद्रास मान्यता देऊ

आमदार सतीश चव्हाण यांची वैजापूर रुग्णालयास भेट

मराठा आरक्षणासाठी विशेष अधिवेशन बोलवा

आ. सतीश चव्हाण यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

आ. चव्हाण यांच्याकडून कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजनांची पाहणी

पद भरतीसाठी प्राध्यापकांचे मुंबईत आंदोलन सुरूच

वसतिगृहांची ५४ टक्के शुल्कवाढ कायम

जैवतंत्रज्ञान महाविद्यालयातील मुलींच्या वसतिगृहासाठी २ कोटींचा निधी मंजूर

आपण पुढाकार घेतल्याचा आ. चव्हाण यांचा दावा

शालेय स्तरावर कृषी अभ्यासक्रमाचा समावेश करा

आमदार सतीश चव्हाण यांची मागणी

शेतकरी उत्पादक कंपन्यांना ६० टक्के अनुदान

कॉक्लिअर ईम्प्लांट शस्त्रक्रियेसाठी वयोमर्यादा वाढवा : चव्हाण

घाटीतील रिक्त पदे त्वरित भरा

उपमुख्यमंत्र्यांचे निर्देश : मंत्रालयात झाली बैठक

उच्च न्यायालयाचा आदेश

...खेर सभागृहासाठी दोन कोटी मंजूर

...मत'चा पाठपुरावा : मंत्रिमंडळ बैठकीत झाला निर्णय

क्षमता, आवडीनुसार करिअरची निवड करा -आ. सती...

ग्रामीण भागात आरोग्य सुविधांचा अभाव

सतीश चव्हाण : वैजापूर येथील उपजिल्हा रुग्णालयास भेट

मोलमजुरी करणाऱ्या कुटुंबांना तातडीने मदत करा : चव्हाण

आ. सतीश चव्हाण यांची जिल्हा रुग्णालयास भेट

कॉक्लिअर इंप्लांट शस्त्रक्रियेसाठी वयोमर्यादा वाढवा

आ. सतीश चव्हाण यांची विधान परिषदेत मागणी

छत्रपती संभाजीनगरमध्ये महिला कृषी महाविद्यालय सुरू करण्याचा ठराव मंजूर

लोहारा ग्रामीण रुग्णालयातील स्थितीचा आमदार चव्हाण यांनी घेतला आढावा

परिस्थिती हाताळण्यासाठी उपाययोजना करण्याच्या सूचना

औरंगाबाद - पुणे रेल्वेसाठी शिफारस करा : आ. चव्हाण

सच

## राष्ट्रवादी कॉंग्रेस, भाजप, शिवसेना
## महायुतीचे अधिकृत उमेदवार

# चव्हाण सतीश भानुदासराव

B. E. (Mech.)

1

## यांनाच प्रथम पसंतीचे मत देऊन विजयी करा !

मतदान - शुक्रवार, दि. 23 ऑक्टोबर 2026

वेळ - सकाळी ८:00 ते दुपारी ५:00 पर्यंत

मतदार यादीत आपले नाव पाहण्यासाठी 0795 355 9512 या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.

सच

Satish Chavan mlcsatishchavan satishchavan55@gmail.com

**कार्यालय पत्ता :-** सहकारनगर, छत्रपती संभाजीनगर- ४३१००५,
**फोन :** ०२४०-२३६२२७७/८८

प्रकाशक : **नितीन बागवे** मुद्रक : **प्रिंटवेल इं. प्रा. लि., छत्रपती संभाजीनगर** प्रती : **1000**